cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–९० | शुक्रवार, दि.२५ जुलै २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### गोंधळात टाकणारा राजीनामा!

उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी रात्री उशिरा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे राजीनामा सादर केला. राष्ट्रपतींनी त्यांचा राजीनामा स्वीकारला. या राजीनामापत्रात धनखड यांनी प्रकृतीचे कारण दिले आहे. मात्र पूर्ण दिवस राज्यसभेचे कामकाज व्यवस्थित चालविल्यानंतर अचानक प्रकृती कशी बिघडली? राजीनामा रहस्यमय आहे असा दावा विरोधी पक्षातील नेत्यांनी केला आहे. प्रकृतीचे कारण की राजकारण? असा सवाल उपस्थित केला जात आहे. या राजीनाम्यावर अनेक प्रश्न उपस्थित करत मंगळवारी संसदेत गदारोळही झाला.

### जुन्या वाहनांशी संबंधित याचिकेवर न्यायालय सुनावणी करणार

नवी दिल्ली–सर्वोच्च न्यायालयाने एनसीआरमध्ये बीएस मानक वाहनांच्या कालबाह्य तारखेशी संबंधित याचिकेवर सुनावणी करण्यास सहमती दर्शविली आहे. पेट्रोल वाहनांसाठी आयुर्मान १५ वर्षे आणि डिझेल वाहनांसाठी १० वर्षे आहे. प्रदूषण नियंत्रणाशी संबंधित सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांनुसार सरकार त्यात बदल करू शकत नाही, असे याचिकाकर्त्याने म्हटले आहे. न्यायालय आता सोमवारी या याचिकेवर सुनावणी करणार आहे.

## थोडक्यात...

### ग्रुप बुकींगवरील ३० टक्के भाडेवाढीचा निर्णय रद्द–शिंदे

पंढरपुर–ग्रुप बुकींगवरील ३० टक्के भाडेवाढीचा निर्णय रद्द करण्यात आल्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. शिंदेंनी पंढरपुरात ही घोषणा केली आहे. त्यामुळे ग्रुप बुकिंग करणाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना भाडेवाढ रद्द करण्याच्या सूचना दिली आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

### जेएनयू विद्यापीठात सुरु होणार मराठी अध्यासन केंद्र

नवी दिल्ली–दिल्लीतील जे एन यू विद्यापीठात आता मराठी अध्यासन केंद्र सुरु होणार आहे. या केंद्राचा भूमीपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.

### सोन्या–चांदीच्या दरात घसरण

पुणे–बाजारामध्ये सोन्या–चांदीच्या दरात मोठी घसरण झाली आहे. सोन्याच्या दरात १ हजार ३०० तर चांदीच्या दरात १ हजार रुपयांनी घसरण झाली आहे. सोन्याचे दर विना जीएसटी ९९ हजार रुपयांवर आले आहेत. तर चांदीचे दर १ लाख १५ हजार रुपयांवर आले आहेत. सोन्याचे दर विना जीएसटी १ लाख ३०० रुपयांवर पोहोचले होते. सोन्याच्या दराने विक्रमी उच्चांकी गाठली होती.

### निवडणूक आयोग काम करत नाही : राहुल गांधी

नवी दिल्ली–निवडणूक आयोगाविरोधात आमच्याकडे पुरावे असल्याचे राहुल गांधींनी म्हटले आहे. तसेच हे प्रकरण गंभीर असून आम्ही मागे हटणार नसल्याचे राहुल गांधी यांनी म्हटले आहे. निवडणूक आयोग काम करत नाही असे देखील राहुल गांधी यांनी म्हटले आहे.

### मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालाला स्थगिती

नवी दिल्ली–मुंबई २००६ ट्रेन बॉम्बस्फोट प्रकरणात महाराष्ट्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने नोटीस बजावली असून उच्च न्यायालयाच्या निर्णयाला सुप्रिम कोर्टाची स्थगिती मिळाली आहे.

### साईबाबा मंदिराला बॉम्बने उडवून देण्याची धमकी

शिर्डी–साईबाबा संस्थानला पुन्हा एकदा बॉम्बने मंदिर उडवून देण्याचा धमकीचा ईमेल आल्याने खळबळ उडाली आहे. या ईमेल आयडीवरून भगवंत मान नावाखाली साई मंदिर आणि त्यातील खोल्यांमध्ये बॉम्ब ठेवल्याचे मेलमध्ये नमूद करण्यात आले आहे. तसेच, भाविक आणि कर्मचाऱ्यांना तात्काळ मंदिरातून बाहेर काढण्याची सूचनाही या मेलमध्ये केली होती. या धमकीनंतर साई संस्थानकडून तातडीने शिर्डी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून, साई संस्थानची सुरक्षा यंत्रणा पूर्णपणे अलर्ट मोडवर आहे.

# कांदा महागणार; बाजार समिती करणार खरेदी

## मंत्री रावल यांची माहिती; ग्राहक विभागाने खरेदीबाबत घेतला मोठा निर्णय

**मुंबई । प्रतिनिधी**

**कांदा उत्पादकांसंदर्भात मोठी बातमी समोर आली आहे. दरवर्षी महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर कांद्याचे उत्पादन घेतले जाते. या पार्श्वभूमीवर ग्राहक विभागाने मोठा निर्णय घेतला आहे. आता यापुढे बाजार समितीच्या माध्यमातून जवळपास ३ लाख टन कांदा खरेदी करण्यात येणार असल्याची माहिती मंत्री जयकुमार रावल यांनी दिली आहे. शासन खरेदी करणार असल्याने येणाऱ्या काळात कांद्याचे दर वाढण्याचे संकेत आहेत.**

कांदा उत्पादकांसंदर्भात मोठी बातमी समोर आली आहे. दरवर्षी महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर कांद्याचे उत्पादन घेतले जाते. या पार्श्वभूमीवर ग्राहक विभागाने मोठा निर्णय घेतला आहे. ग्राहक विभागातर्फे जवळपास ३ लाख टन कांदा खरेदी करण्यात येणार आहे. कांद्याची ही



खरेदी बाजार समितींनी करण्याबाबत आपण सांगितल्याची माहिती मंत्री जयकुमार रावल यांनी दिली आहे. कांद्याची लोकांसमोर खरेदी झाल्यास चांगला भाव मिळेल या उद्देशाने ही खरेदी पारदर्शकपणे देखील करण्यात येणार असल्याची माहिती जयकुमार रावल यांनी दिली आहे. यात चुकीचे काही झाल्यास कठोर करावाई करण्यात येईल अशी माहितीही जयकुमार रावल यांनी दिली. कांद्याची खरेदी ही बाजार समित्यांच्या मार्फत व्हावी ▶▶ पान २ वर

### “ गैरप्रकार रोखण्यासाठी दक्षता समिती नियुक्त

केंद्र शासनाच्या केंद्रीय ग्राहक संरक्षण, अन्न व सार्वजनिक वितरण मंत्रालय हे ‘नाफेड’ व ‘एनसीसीएफ’या केंद्रीय नोडल संस्थेमार्फत कांदा उत्पादक शेतकऱ्यांकडून किंमत स्थिरता निधी योजनेअंतर्गत कांद्याची खरेदी होते. मात्र यात अनियमितता व भ्रष्टाचाराची अनेक गंभीर प्रकरणे समोर आली आहेत. कांदा खरेदी प्रक्रियेदरम्यान अनियमितता किंवा गैरव्यवस्थापन टाळण्यासाठी तसेच खरेदी केंद्रांवर शासनाचे प्रत्यक्ष नियंत्रण ठेवण्यासाठी दक्षता समिती नियुक्त केली आहे. ही स्वागतार्ह बाब आहे मात्र प्रत्यक्षात कारभार सुधारणार का, हा सवाल कायम आहे.

### “ गेल्या दोन वर्षांपासून कांदा खरेदीमध्ये अनियमितता

महाराष्ट्रात नाशिक, पुणे, अहिल्यानगर आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात खरेदी दीड महिना उशिराने सुरू झाली. गेल्या दोन वर्षांपासून कांदा खरेदीमध्ये अनियमितता आहे. तसेच शेतकरी संघटनांनी शासनाकडे तक्रारी केल्या होत्या. या मुद्द्यावर शासन गंभीर नसल्याने सरकार टीकेचे धनी झाले आहेत.

# कोकाटेंविषयी अजित पवार अंतिम निर्णय घेण्याच्या तयारीत

## सोमवारी होणाऱ्या बैठकीत होणार फैसला



**मुंबई । प्रतिनिधी**

कृमंत्री माणिकराव कोकाटे यांचा सभागृहात रम्मी खेळतानाचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. पवार यांनी या घटनेची चौकशी सुरू असल्याचे सांगितले आणि मुख्यमंत्री आणि स्वतः मिळून निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. याबाबत सोमवारी होणाऱ्या बैठकीत कोकाटेंच्या राजीनाम्याबाबत फैसला होणार आहे.

सध्या राज्याच्या राजकारणात कृषीमंत्री माणिकराव कोकाटे हे वादाच्या भोवऱ्यात अडकले आहेत. माणिकराव कोकाटे यांचा भर सभागृहात अधिवेशनादरम्यान मोबाईलवर रम्मी गेम खेळतानाचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. या व्हिडीओवरुन विरोधकांकडून जोरदार आरोप–प्रत्यारोप सुरु आहेत. रम्मी मास्टर कृषीमंत्री, शेतकऱ्यांनो विसरा हमी, ▶▶ पान २ वर

# परळीत आठ लाखांचे चंदन पकडले आरोपी फरार

परळी । प्रतिनिधी

परळी वैजनाथ रेल्वे पटरीच्या उत्तर बाजूस असलेल्या पालांमध्ये चंदनाची तस्करी सुरू असल्याची गुप्त माहिती बीडच्या एलसीबी विभागाला मिळाल्यानंतर पथकाने मोठ्या शिताफीने छापा मारून जवळपास ८ लाख ६८ हजार रुपयाचे तोडलेले चंदन पकडले मात्र छाप्या वेळी आरोपी घटनास्थळावरून फरार झाले पोलीस त्यांच्या मागावर असून पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे .

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार दि. २३ जुलै २०२५ रोजी रात्री ८.३०वाजण्याच्या सुमारास, परळी वैजनाथ रेल्वे पटरी ते इराणी गल्ली या परिसरात तस्करांनी कापडी पालांमध्ये चंदन लाकूड साठवले होते. पोलिसांनी घटनास्थळी अचानक धाड टाकून मुद्देमाल हस्तगत केला. ही कामगिरी स्थानिक गुन्हे शाखा,बीडचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनात हवालदार रामचंद्र ▶▶ पान २ वर

# अखेर धनंजय मुंडेच खरे ठरले आरोप करणारे तोंडघशी पडले!

## कृषी विभागाची ती खरेदी नियमानुसारच–उच्च न्यायालयाचा निर्णय

**मुंबई । प्रतिनिधी**

**तत्कालीन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या कार्यकाळात राज्य शासनाच्या कृषी विभागाने शेती पूरक साहित्य खरेदी साठी राबवलेल्या विशेष कृती आराखड्यांतर्गत कृषी साहित्याच्या थेट खरेदी व वितरणाच्या निर्णयास मुंबई उच्च न्यायालयाने वैध ठरवले असून, यास विरोध करणाऱ्या दोन्ही याचिका फेटाळल्या आहेत.**

न्यायमूर्ती आलोक आराधे व संदीप व्ही. मर्णे यांच्या खंडपीठाने ▶▶ पान २ वर



### सत्यमेव जयते–धनंजय मुंडे


दरम्यान शेतकरी वर्गास उत्पन्न वाढीच्या दृष्टीने देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या धोरणाचा विचार करून शेतकऱ्यांच्या हीतास प्राधान्य देणारा धोरणात्मक निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला होता. त्याच्या विरोधात अनेकांनी माझ्यावर आरोप करून माझी बदनामी केली; मात्र आज न्याय देवतेने सत्याची बाजू समोर आणत योग्य न्याय केला असून आपला तो निर्णय योग्यच होता, असे म्हणत सत्यमेव जयते अशी प्रतिक्रिया माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी निकालावर व्यक्त केली आहे.

# बस–दुचाकीच्या भीषण अपघातात पती–पत्नी ठार

**पाटोदा । प्रतिनिधी**

**येथील ग्रामीण रुग्णालयासमोर बस आणि दुचाकीचा भीषण अपघात घडला भरधाव वेगात आलेल्या बसने दुचाकीवर आलेल्या पती–पत्नींना जोरदार धडक दिली. अपघात इतका भीषण होता की दोघांचाही जागीच मृत्यू झाला आहे.आज आठवडी बाजार असल्याने गर्दी होती त्यातच या अपघातात दोघांचा बाली गेल्याने हळहळ व्यक्त होत आहे.**

मृत दाम्पत्य पाटोदा तालुक्यातील भाटेवाडी येथील रहिवासी असून आज



बाजाराचा दिवस असल्यामुळे ते बाजारासाठी निघाले होते. पती–पत्नी दुचाकीवरून जात असताना रुग्णालयासमोर अचानक ▶▶ पान २ वर

# जलजीवनची सरकारकडे तब्बल ३५ हजार कोटींची थकबाकी

**बीड । प्रतिनिधी**

देशातील ग्रामीण भागातील नागरिकांना दारात पाणी आणि स्वच्छ पाणी मिळावे म्हणून केंद्राच्या मदतीने जलजीवन मशीन योजना अमलात आणली पण वेळेवर निधी मिळत नसल्याने सांगली जिल्ह्यातील तांदुळवाडी येथिल कंत्राटदार हर्षल पाटील यांनी आत्महत्ये केल्याची धक्कादायक घटना समोर आली.त्यातच राज्यात जलजीवन मिशनच्या कामाची तब्बल ३५ हजार ६२२ कोटी रुपयांची थकबाकी असल्याची असल्याचे समजते जिल्ह्यात देखील अनेक कामे अर्धवट असल्याचे चित्र आहे.




हर्षल पाटील यांनी शासनाकडून कामाचे पैसे न मिळाल्यामुळे आणि त्यासाठी घेतलेल्या कर्जाच्या मानसिक ▶▶ पान २ वर

# २० लाखांचा गुटखा पकडला

नेकनूर । प्रतिनिधी

राज्यात बंदी असलेल्या गुटख्याची तस्करी मोठ्या प्रमाणात होत असून या विरिध कारवाई सुरु असली तरी पार राज्यातून होणारी गुटख्याची वाहतूक रोखताना नेकनूर पोलिसांनी मध्यरात्री मोठी कारवाई करत सुमारे २० लाख ७१ हजार रुपयांचा गुटखा जप्त केला आहे. मात्र यातील आरोपी फरार होण्यात यशस्वी झाला.

नेकनूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत गोसावी याना मिळालेल्या माहितीनुसार एका वाहनातून ▶▶ पान २ वर

# वयोवृद्ध रुग्णाच्या मुलाला स्टाफकडून जबर मारहाण

**बीड । प्रतिनिधी**

येथील श्री सिद्धिविनायक नेत्रालय या ठिकाणी रुग्णांचे नातेवाईक यांना हॉस्पिटल मधील स्टाफने मारहाण केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.विचारपूस कक्षामध्ये विचारपूस करण्यासाठी आलेल्या रुग्ण व नातेवाईकाला तीन ते चार स्टाफ मधील तरुणांनी बेदम



मारहाण केली.ते स्टाफ मधीलच होते का याची माहिती मिळू शकली नाही.

गेवराई तालुक्यातील सिरसदेवी ▶▶ पान २ वर

# महसुलच्या दांडीबहाद्दरांना लागणार लगाम!

## तलाठ्यापासून उपजिल्हाधिकाऱ्यांपर्यंत फेस ॲप नोंदणी बंधनकारक–पाटील

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यातील महसूल कर्मचाऱ्यांसाठी आता शासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे, तलाठ्यांपासून ते उपजिल्हाधिकाऱ्यांपर्यंत सर्वांनाच दररोज ऑफिसमध्ये हजेरी लावावी लागणार आहे. तरच कर्मचाऱ्यांचा पगार निघणार असल्याची माहिती महसुल मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली. याबाबत लवकरच शासन निर्णय काढण्यात येणार असल्याचे ते म्हणाले.**

महसुलमधील बरेच तलाठी आणि मंडळ अधिकाऱ्यासह इतर कर्मचारी हे दांडीबहाद्दर आहेत. काम न करता शासनाकडून पगार घेतात. आता अशा दांडीबहाद्दरांना शासनाने लगाम घालण्याचा निर्णय घेतला आहे. कर्मचाऱ्यातील बरेच ऑफिसमध्ये फेस ॲपवर नोंदणी झाली तरच या कर्मचाऱ्यांना यापुढे वेतन मिळणार आहे. यासंदर्भात लवकरच शासन आदेश जारी करण्यात येईल, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. विशेष ▶▶ पान २ वर



## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२३ जुलै २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २१.०० क्विंटल | २,४५१ | २,७२८ | २,५६८ |
| ज्वारी/हायब्रिड: ९३.५० क्विंटल | १,९५० | ३,०७० | २,४९३ |
| मका/लोकल:१२.५० क्विंटल | २,०२० | २,२८० | २,१५० |
| तूर : २५.५० क्विंटल | ६,३०० | ६,५०० | ६,४२६ |
| उडीद : १.५० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: ७१.५० क्विंटल | २,११० | २,८५८ | २,६३४ |
| मुग: ०.५० क्विंटल | ६,९०० | ६,९०० | ६,९०० |
| सोयाबीन: २५.०० क्विंटल | ३,९०० | ३,९०० | ३,९०० |
| हरभरा: ३.०० क्विंटल | ४,६०० | ५,१११ | ४,८५५ |

# खासगी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये आता १० टक्के ईडब्ल्यूएस कोटा

**मुंबई । प्रतिनिधी**

खासगी विनाअनुदानित वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातून प्रवेश घेण्याचा खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांचा मार्ग मोकळा झाला आहे. खासगी विनाअनुदानित कॉलेजांतील राज्य कोट्यातील एकूण जागांपैकी १० टक्के जागांवर ईडब्ल्यूएस प्रवर्गातून कॉलेजांना प्रवेश द्यावे लागणार आहेत.

वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने जाहीर केलेल्या माहिती पुस्तिकेतून ही बाब समोर आली आहे. याचबरोबर महाराष्ट्र हे आरक्षण लागू करणारे देशातील पहिले राज्य ठरणार आहे, असे शिक्षणतज्ज्ञांनी सांगितले. त्यातून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे. राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने एमबीबीएस, बीडीएस, बीएएमएस, बीएचएमएस, बीयूएमएस, बीएनवायएस, बीपीटीएच आदी वैद्यकीय शाखांच्या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी माहिती पुस्तिका व प्रवेशाचे वेळापत्रक बुधवारी जाहीर केले. ▶▶ पान २ वर

# ना.पंकजाताई मुंडेंना वाढदिवसानिमित्त कार्यकर्त्यांकडून गोमातेची अनोखी भेट

## पुंगनूर जातीच्या गोमातेचे रामटेकवर आगमन; औक्षण, पूजनाने झाले स्वागत

**बीड । प्रतिनिधी**

**राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांना कार्यकर्त्यांनी वाढदिवसानिमित्त पुंगनूर जातीच्या गायींची अनोखी भेट दिली. रामटेक निवासस्थानी त्यांनी औक्षण व पूजन करत गायींचे जोरदार स्वागत केले. या अनोख्या भेटीने आनंदित झालेल्या पंकजाताईंनी ही गोड भेट माझ्या कायम स्मरणात राहील असं म्हटलं.**

पुंगनूर हा शुध्द भारतीय गोवंश असून ही गाय जगातील सर्वात लहान उंचीची गाय मानली जाते. आंध्र प्रदेशातील चित्तूर जिल्ह्यातील पुंगनूर तालुक्याच्या नावाने ही ओळखली जाते. आकार लहान असला तरी तिच्या दुधाला आरोग्यदायी गुणधर्म असतात. या दुधामध्ये एटू प्रकारचे प्रथिन आढळतात, जे शरीरासाठी उपयुक्त मानले जाते. ▶▶ पान २ वर



cmyk

## अग्रलेख

# गोंधळात टाकणारा राजीनामा!

उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी रात्री उशिरा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे राजीनामा सादर केला. राष्ट्रपतींनी त्यांचा राजीनामा स्वीकारला. या राजीनामापत्रात धनखड यांनी प्रकृतीचे कारण दिले आहे. मात्र पूर्ण दिवस राज्यसभेचे कामकाज व्यवस्थित चालविल्यानंतर अचानक प्रकृती कशी बिघडली? राजीनामा रहस्यमय आहे असा दावा विरोधी पक्षातील नेत्यांनी केला आहे. प्रकृतीचे कारण की राजकारण? असा सवाल उपस्थित केला जात आहे. या राजीनाम्यावर अनेक प्रश्न उपस्थित करत मंगळवारी संसदेत गदारोळही झाला. मात्र, केंद्रीय मंत्री अनुप्रिया पटेल यांनी धनखड यांच्या राजीनाम्याबद्दल सरकारला कल्पना नसल्याचे स्पष्ट केले. नेते जयराम रमेश यांनी 'एक्स'वर लिहिले की, सोमवारी दुपारी साडेबाराच्या सुमारास जगदीप धनखड यांच्या अध्यक्षतेखाली राज्यसभेच्या कामकाज सल्लागार समितीची बैठक झाली. या बैठकीला सभागृह नेते जे. पी. नड्डा आणि संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांच्यासह इतर सदस्य उपस्थित होते. थोड्या वेळाच्या चर्चेनंतर पुढील बैठक संध्याकाळी साडेचार वाजता घेण्याचे ठरले. त्यावेळी पुन्हा एकदा धनखड यांच्या अध्यक्षतेखाली समितीचे सदस्य बैठकीला हजर झाले. सर्वजण नड्डा आणि रिजिजू यांची वाट पहात होते. पण ते आलेच नाहीत. आश्चर्याची गोष्ट म्हणजे या दोन्ही मंत्र्यांनी संध्याकाळच्या बैठकीला उपस्थित राहणार नाही याबाबत धनखड यांना कोणतीही माहिती दिली नाही. या गोष्टीचे धनखड यांना वाईट वाटले आणि त्यांनी कामकाज सल्लागार समितीची बैठक पुढे ढकलून मंगळवारी दुपारी एक वाजता ठेवली. पंतप्रधान मोदी मंगळवारी दिवसभर संसद भवनात होते. त्यांनी दोन बैठका घेतल्या. या बैठकीत न्या. वर्मा यांच्यावरील महाभियोगाची चर्चा झाली की, धनखड यांच्या राजीनाम्याबाबत चर्चा झाली हे गुलदस्त्यात आहे. मात्र, यावरून हे स्पष्ट होते की, सोमवारी १ ते ४:३० वाजेपर्यंत नक्कीच काहीतरी गंभीर घडले. म्हणूनच नड्डा आणि रिजिजू यांनी मुद्दाम संध्याकाळच्या बैठकीला उपस्थित राहणे टाळले. त्यानंतर धनखड यांनी उपराष्ट्रपतिपदाचा राजीनामा दिला.

खरे तर जगदीप धनखड यांनी नेहमीच २०१४ नंतरच्या भारताची प्रशंसा केली. पण त्याचवेळी शेतक-यांच्या हितासाठी स्पष्टपणे आवाज उठवला. त्यांनी सार्वजनिक जीवनातील वाढत्या अहंकारावरही टीका केली आणि न्यायपालिकेची जबाबदारी व संयम यावर भर दिला. मोदी सरकारच्या काळातही शक्य तितक्या प्रमाणात त्यांनी विरोधकांना स्थान देण्याचा प्रयत्न केला. त्यांना नियम, प्रक्रिया आणि संसदीय शिस्त याबाबत आदर होता. पण त्यांच्या भूमिकेमध्ये सतत याची उपेक्षा होत असल्याची भावना जाणवत होती. धनखड यांचा राजीनामा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाविषयी अनेक गोष्टी स्पष्ट करतो. त्याचबरोबर ज्यांनी त्यांना उपराष्ट्रपतिपदापर्यंत पोहोचवले त्या व्यक्तींच्या हेतूंवरही तो गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करतो. प्रकृती अस्वास्थ्याचे कारण देत जगदीप धनखड यांनी उपराष्ट्रपतिपदाचा राजीनामा दिला असला तरी केंद्र सरकार आणि भाजपच्या वरिष्ठ नेतृत्वाला ते डोईजड झाल्यामुळे त्यांची 'हकालपट्टी' करण्यात आल्याचे स्पष्ट झाले. 'वरिष्ठां'ना न विचारता न्या. वर्मा यांच्यावर विरोधकांनी आणलेला महाभियोग प्रस्ताव स्वीकारणे धनखड यांना भोवल्याचे सांगितले जाते. भाजपकडून न्या. यशवंत वर्मांविरोधात महाभियोग प्रस्ताव लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला यांच्याकडे देण्यात आला. त्याचवेळी ६६ विरोधी पक्षांच्या सदस्यांनी स्वाक्षऱ्या केलेला प्रस्ताव धनखड यांनी स्वीकारला.

त्यामुळे 'एकमताने महाभियोग' चालविण्याचे सत्ताधा-यांचे मनसुबे उधळले गेले व भाजपची नाचक्की झाली. त्यानंतर पंतप्रधान मोदी, अमित शहा आणि राजनाथ सिंह यांची महत्त्वाची बैठक झाली. राजनाथ सिंह यांच्या दालनातही काही बैठका झाल्या. त्यावेळी नड्डा व रिजिजू उपस्थित होते. त्यानंतर धनखड यांना राजीनामा देण्यास सांगण्यात आले, असे सांगितले जाते. न्या. वर्मा यांच्या विरोधातील महाभियोग कारवाई भाजप व राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या पुढाकाराने झाली पाहिजे अशी केंद्रीय नेतृत्वाची भूमिका होती. धनखड यांनी राजीनामा का दिला? याचे स्पष्टीकरण केंद्राने द्यावे, अशी मागणी काँग्रेसने केली. धनखड यांनी प्रकृती बरी नसल्याने राजीनामा दिला की, राजकीय कारणामुळे पद सोडले असा सवाल समाजवादी पक्ष, भाकप, शिवसेना (उबाठा) व विरोधी पक्षांनी उपस्थित केला. काँग्रेस नेते हरिश रावत म्हणाले की, धनखड यांच्या राजीनाम्याची बातमी अत्यंत धक्कादायक आहे. त्यांच्या राजीनाम्यामागे असाधारण कारण असू शकते. सरकारमध्ये कुठेतरी काहीतरी असे घडत होते की, त्याची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी स्वत:च्या सन्मानाचे रक्षण करण्यासाठी राजीनाम्याचा निर्णय घेतला असावा. खासदार मनीष तिवारी म्हणाले, धनखड यांचा राजीनामा रहस्यमय आहे. कारण उपराष्ट्रपतिपद हे दुसऱ्या क्रमांकाचे घटनात्मक पद आहे.

ज्या अनपेक्षित पद्धतीने त्यांनी राजीनामा दिला ती गोष्ट गोंधळात टाकणारी आहे. खासदार भूपेश बघेल म्हणाले, धनखड यांचा राजीनामा राजकीय वादळाचे संकेत दर्शवितो. धनखड यांच्या राजीनाम्यावर भाजपच्या कोणत्याही नेत्याने प्रतिक्रिया दिली नाही. पंतप्रधान मोदी 'एक्स'वर म्हणाले, धनखड यांना देशाचे उपराष्ट्रपती तसेच अनेक महत्त्वाच्या भूमिका निभावत राष्ट्रसेवा करण्याची संधी मिळाली आहे. त्यांच्या उत्तम आरोग्याची मी मनापासून प्रार्थना करतो. आता केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांना उपराष्ट्रपतिपद दिले जाईल अशी चर्चा आहे. कारण ते लवकरच ७५ वर्षांचे होत आहेत. भाजपच्या नव्या नियमानुसार त्यांना सक्रिय राजकारणापासून निवृत्त व्हावे लागेल. आता निवडणूक आयोगाने उपराष्ट्रपती निवडीची प्रक्रिया सुरू केली आहे.

# जिल्हा परिषदेच्या ५ कर्मचाऱ्यांना पदोन्नती

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन कनिष्ठ सहाय्यक, वरिष्ठ सहाय्यक, दर्जाच्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याचा निर्णय बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी घेतला. दिनांक १६ जुले जुलै २०२५ रोजी सदर पदोन्नतीचे आदेश देण्यात आले आहे. यामध्ये चार जणांना कनिष्ठ प्रशासन अधिकारीपदी पदोन्नती देण्यात आली आहे. तर एका जनास सहाय्यक प्रशासन अधिकारी म्हणून पदोन्नती देण्यात आली.**

गेवराई येथे कनिष्ठ प्रशासन अधिकारी कार्यरत असलेले श्रीकृष्ण जाधव यांना सहाय्यक प्रशासन अधिकारी पदोन्नती देण्यात आली. त्यानं त्यांना पंचायत समिती आष्टी येथे पदस्थापना देण्यात आली आहे. वरिष्ठ सहाय्यक असलेल्या चार जणांच्या पदोन्नतीमध्ये विनय सुपेकर यांना अंबाजोगाई येथून सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद बीड येथे शिक्षण विभागातील वरिष्ठ सहाय्यक कैलास तांगडे यांना गेवराई पंचायत समिती शिरूर येथे कार्यरत असलेले धनंजय जोशी यांना ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद बीड तर पाटोदा येथे कार्यरत असलेले विवेकानंद औसरमल यांना पदोन्नती देऊन शिरूर (कासार) येथे पदस्थापना देण्यात आली आहे. बीड जिल्हा परिषदेचे नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान यांनी पदोन्नतीचा प्रश्न मार्गी लावला. सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप काकडे यांनी सदर पदोन्नतीसाठीची सर्व प्रक्रिया विभागामार्फत पूर्ण त्यामुळे सदर पदोन्नती झाल्या आहेत.

### समुपदेश न घेतल्याने उलटसुलट चर्चा

जिल्हा परिषदेच्या चार वरिष्ठ सहाय्यक कर्मचाऱ्यांना पदोन्नत्या देण्यात आल्या. मात्र सदर कर्मचाऱ्यांना पदोन्नतीनंतर नियुक्ती देताना नियमानुसार समुपदेशन घेणे गरजेचे होते. मतदार समुपदेशन का घेण्यात आले नाही? याबाबत उलट सुलट चर्चा होत आहे.

# वडवणी तालुका भाजपच्या वतीने पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने पर्यावरण सप्ताहाचे आयोजन

**वडवणी । प्रतिनिधी**

**पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने माजी आमदार केशवराव आंधळे यांच्या मार्गदर्शनाखाली, भाजपा बीड जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांच्या सूचनेनुसार वडवणी तालुका भाजपच्या वतीने दि.२६ जुलै ते २ ऑगस्ट यादरम्यान संपूर्ण वडवणी तालुक्यात २५ गावांमध्ये विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप वृक्षारोपण, वृक्ष वाटप कापडी पिशव्यांचे वाटप देशी गाईंचे पूजा व खाद्य वाटप या सह विविध सामाजिक उपक्रम राबवून नामदार पंकजाताई मुंडे यांचा वाढदिवस पर्यावरण सप्ताह म्हणून साजरा करण्यात येणार असल्याची माहिती वडवणी येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेच्या वेळी बोलताना भाजपचे युवा नेते संजय भाऊ आंधळे यांनी दिली आहे.**



महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या आवाहनानुसार त्यांचा वाढदिवस हा पर्यावरण व सामाजिक उपक्रम राबवून साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले होते यासाठी वडवणी तालुक्यातील भाजपच्या वतीने वाढदिवसाच्या निमित्ताने पर्यावरण सप्ताह साजरा करण्यासाठी माहिती देण्यासाठी उडून येते पत्रकार परिषदेच्या आयोजन करण्यात आलेले यावेळी युवा नेते संजय भाऊ आंधळे यांनी सांगितले की वडवणी तालुक्यातील २५ गावे व बारा वाड्या व सहा तांडे येथील जिल्हा परिषद शाळेतील तीन हजार विद्यार्थ्यांना २१ हजार वह्या व शालेय साहित्याचे वाटप करण्यात येणार आहे ५०० विद्यार्थ्यांना स्कूलबॅग वाटप करण्यात येणार आहे पाच हजार कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात येणार आहे वडवणी शहरात उपनगराध्यक्ष बन्सी भाऊ मुंडे व माजी उपनगराध्यक्ष अंकुश वारे यांच्या वतीने वृक्षारोपण करण्यात येणार आहे देवडी येथे शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप व वृक्षारोपण करण्यात येणार आहे तसेच चिंचवण येथे ईश्वर तांबडे यांच्या वतीने तरुणांना लेझीम साहित्याचे वाटप करण्यात येणार आहे तसेच धनराज मुंडे यांच्या वतीने देशी गाईची पूजा व खाद्य वाटप करण्यात येणार आहे अशाप्रकारे वाढदिवसाच्या निमित्ताने वडवणी तालुक्यात दिनांक २६ जुलै ते दोन ऑगस्ट या कालावधीत विविध सामाजिक उपक्रम राबवून पर्यावरण पूरक सप्ताह राबविण्यात येणार आहे यासह तर अनेक सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहे असे सांगितले यावेळी या पत्रकार परिषदेला भाजप ताालुका अध्यक्ष सुखदेव रेडे, उपनगराध्यक्ष बन्सी भाऊ मुंडे मुडे, मा. उपनगराध्यक्ष अकुश वारे, माजी भाजपा तालुकाध्यक्ष मच्छिन्द्र झाटे,डॉक्टर खोटे, इश्वर तांबडे , बालासाहेब बादाडे, धनराज मुडे,सरपंच दिनेश नाईकवाडे यासह इतर भाजपा पदाधिकारी उपस्थित होते.

# जि.प.विविध कार्यालयामध्ये थकून घाण केल्यास दंड-सीईओ मीनु पी.एम.



**जालना । प्रतिनिधी**

**कार्यालयीन परिसरातील शिस्त, स्वच्छता व सूचना व्यवस्थापन ची अंमलबजावणी करण्यासाठी कोणत्याही कर्मचाऱ्याने अथवा अभ्यांगताने किंवा त्रयस्त व्यक्तीने कार्यालय परिसरात कचरा, पान, तंबाकूजन्य पदार्थ खाऊन थुकून, किंवा इतर कोणत्याही स्वरूपात घाण केल्यास संबंधित व्यक्तीकडून रु५०००/- पर्यंतचा दंड केला जाईल. या निर्णयाची सर्व विभाग प्रमुखाने सक्त अंमलबजावणी करावी असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनु पी. एम. यांनी केले आहे. यावेळी बोलताना ते म्हणाले की अगोदर जिल्हा परिषद सर्व कार्यालयामध्ये या नियमाची शिस्त लावून यानंतर सर्व पंचायत समिती कार्यालयामध्ये सुद्धा थकून घाण करणाऱ्या विरुद्ध दंड करण्यात येणार आहे. असे यावेळी बोलताना जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी मीनु पी.एम यांनी सांगितले.**

जिल्हा परिषद, पंचायत समिती स्तरावरील कार्यालयीन परिसर स्वच्छ व नीटनेटका राहावा यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आदर्श नियमावली तयार केली असून त्याची तात्काळ अंमलबजावणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सदरील नियमाची पालन करण्याची जबाबदारी त्या त्या विभागाच्या कार्यालय प्रमुख, सहाय्यक प्रशासन कनिष्ठ प्रशासन यांच्या वर देण्यात आली आहे. तसेच पोस्टर स्टिकर पोष्टर/कागदपत्र लावण्यास मनाई कार्यालयाच्या भिंतीवर, दरवाज्यावर, कपाटावर, टेबलवर किंवा फर्निचरवर कुठलेही पोष्टर, फोटोज, सूचना बॅनर स्टिकर्स लावण्यावर प्रतिबंध करण्यात आला असून असे कृत्य आढळून आल्यास संबंधित कर्मचाऱ्यावर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेच खिडकी, बाल्कनीतून कोणी कचरा टाकत असेल त्यावर हि कार्यवाही केली जाणार आहे. कार्यालयात संकलित होणाऱ्या कचऱ्याची पर्यावरण पूरक पद्धतीने व्यवस्थापन केले जाणार आहे. या शिवाय प्रत्येक कार्यालयात नोटीस बोर्ड लावण्यास अनिवार्य केले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केलेल्या कार्यालयीन पाहणीनंतर ही नियमावली तयार केली असून या पुढे हि कधीही पूर्व कल्पना न देता कार्यालयीन पाहणी केली जाणार असल्याचे पत्रकात नमूद केले आहे.

## पान १ वरून...

### कांदा महागणार; बाजार

असा आग्रह आम्ही केंद्र सरकारडे केल्याची माहिती रावल यांनी दिली आहे. लोकांसमोर खरेदी झाली तर दर वाढण्याची शक्यता आहे. दरम्यान, महाराष्ट्र दरवर्षी मोठ्या प्रमाणात कांद्याचे उत्पादन घेतले जाते. मात्र, ज्यावेळी शेतकऱ्यांचा कांदा बाजारात येतो त्यावेळी दर कमी होतात. याचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसतो. मागील वर्षी अचानक सरकारनं कांदा निर्यातबंदीचा निर्णय घेतला होता. याचा मोठा तोटा शेतकऱ्यांना सहन करावा लागला.

----------

### कोकाटेंविषयी अजित पवार

खेळा रम्मी, अशी टोलेबाजीही केली जात आहे. आता या कृषीमंत्र्यांच्या व्हिडीओवर उपमुख्यमंत्री अजित पवारांनी प्रतिक्रिया दिली आहे. अजित पवार यांनी नुकतंच विविध विकास कामांच्या बैठकांना हजेरी लावली. यानंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी कृषीमंत्री माणिकराव कोकाटेंबद्दल भाष्य केले. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री आम्ही मिळून याबद्दलचा निर्णय घेऊ, असे अजित पवारांनी म्हटले.

**मला ते अद्याप भेटलेले नाहीत**

मला कृषीमंत्र्यांच्या त्या व्हिडीओबद्दल जी माहिती मिळाली, ती घटना सभागृहाच्या आत घडलेली आहे. विधीमंडळाचा जो काही परिसर आहे तो राम कदम आणि राहुल नार्वेकर यांच्या अखत्यारीत येतो. त्यांनीही त्याबद्दलची चौकशी लावलेली आहे, अशी माझी माहिती आहे. नक्की तिथे काय घडले, याबद्दल चौकशी सुरु आहे. मला ते अद्याप भेटलेले नाहीत, असे अजित पवार म्हणाले.

**हनीट्रॅपचे व्हिडिओ असतील तर सार्वजनिक करा**

अजित पवार म्हणाले, एकदाच सांगतो दम द्यायचा बंद करा, तुमच्याकडे व्हिडिओ असेल पेन ड्राईव्ह असेल, तर बाहेर काढा आणि ते लोकांसमोर येऊ द्या, अशा शब्दात त्यांनी विरोधकांना आव्हान दिले.

---------------

### अखेर धनंजय मुंडेच खरे ठरले

हा निर्णय दिला. तत्कालीन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या भोवती या धोरणात्मक निर्णयाच्या विरोधात आरोपांची राळ उठवून व्यावसायिक दृष्टिकोन ठेऊन चुकीचे आरोप करण्यात आले होते. मात्र धनंजय मुंडे यांनी राज्य मंत्रिमंडळाची रीतसर मान्यता घेऊनच शेतकऱ्यांच्या हितासाठी हा धोरणात्मक निर्णय घेऊन सदर प्रक्रिया राबवली, असे मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. प्रकरणाची पार्श्वभूमी: राज्य शासनाने १२ मार्च २०२४ रोजी काढलेल्या शासन निर्णयानुसार, बॅटरीवर चालणारे स्प्रेयर, नॅनो युरिया, नॅनो डीएपी, मेटाल्डिहाईड कीटकनाशक व कापूस साठवणीसाठी बॅग्स यांसारख्या पाच वस्तू शेतकऱ्यांना थेट खरेदी करून महाराष्ट्र अ‍ॅग्रो इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन व महाराष्ट्र स्टेट पॉवरलूम कॉर्पोरेशन यांच्यामार्फत पुरवण्याचे नियोजन करण्यात आले होते. या निर्णयावरून धनंजय मुंडे यांच्या नावाने घोटाळा हा शब्द वापरून अनेकांनी मुंडेंची व कृषी विभागाची बदनामी केली होती. या निर्णयाला विरोध करताना व उमेश भोळे यांच्यासह तीन शेतकऱ्यांनी स्वतंत्र याचिका व जनहित याचिका दाखल करून या वस्तूंना थेट लाभ हस्तांतरण योजनेतून वगळण्यास विरोध दर्शवला होता. राज्य शासनाची बाजू: राज्य शासनाने आपली बाजू मांडताना स्पष्ट केले की, २०१६ मधील योजना व २०२३-२४ मधील विशेष कृती आराखडा ही दोन्ही योजना स्वतःच्या स्वरूपात वेगळी असून त्यांची उद्दिष्टे ही केवळ शेतकऱ्यांचे हीत एवढेच आहेत. विशेष कृती आराखड्याचा उद्देश शेतकऱ्यांना केवळ आर्थिक मदत नव्हे, तर पीक उत्पादन, प्रशिक्षण, प्रात्यक्षिके यांचा समावेश असलेले सर्वांगीण पाठबळ देणे हा आहे व तो पूर्णपणे योग्य आहे. शासनातर्फे अ‍ॅड. अंतुरकर, अ‍ॅड. व्यंकटेश दौंड, अ‍ॅड. कुंभकोनी यांनी बाजू मांडली. न्यायालयाचा निर्णय: न्यायालयाने नमूद केले की योजना व विशेष कृती आराखडा यांचा एकमेकांशी संबंध नाही. शासनाने धोरणात्मक निर्णय घेतले असून त्यात हस्तक्षेप करण्याचे कारण नाही. लेखी याचिका ३२६०/२०२४ फेटाळताना न्यायालयाने स्पष्ट केले की याचिकाकर्ते केवळ आपल्या व्यवसायाच्या हितासाठी न्यायालयात आले आहेत. तसेच या प्रकरणाचा वापर करून अनेकांनी शासनाच्या तत्कालीन धोरणावर चुकीचे भाष्य करून बदनामी साध्य केली. क्र. २५/२०२५ हीसुद्धा न्यायालयाने ''खाजगी व्यावसायिक हेतू'' असल्याचे म्हणत फेटाळली आहे. विशेषतः याचिकाकर्ते तुषार पाडगिलवार यांनी न्यायालयीन प्रक्रियांचा गैरवापर करत ''फोरम शॉपिंग'' केल्याबद्दल ₹१ लाख दंड ठोठावण्यात आला. हा दंड ४ आठवड्यांत हायकोर्ट विधी सेवा प्राधिकरणाकडे भरावा लागेल; अन्यथा संबंधित जिल्हाधिकाऱ्याद्वारे भूमिकराप्रमाणे वसुलीचे आदेश देण्यात आले आहेत. याचिका कर्त्यांची खोटी भूमिका उघड विशेष म्हणजे स्प्रेयर निर्माते तुषार पडगीलवार यांनी स्वतःच्या खाजगी हितासाठी प्रथम मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली, पण निर्णय विरोधात जाईल हे लक्षात येताच त्यांनी मुख्य मागण्या मागे घेतल्या. त्यानंतर त्यांनी नागपूर न्यायालयात जनहित याचिकेच्या नावाखाली काही शेतकऱ्यांना पुढे करत खोटे बिल्स व खोटे पुरावे दाखवून न्यायालयाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. यावरही न्यायालयाने भाष्य केले आहे. या निर्णयामुळे राज्य शासनाच्या कृषी उत्पन्नवाढीच्या विशेष कृती आराखड्याला न्यायालयीन मान्यता मिळाली आहे. तत्कालीन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी राबवलेली ही थेट खरेदी प्रक्रिया पारदर्शक व शेतकऱ्यांच्या हितास पूरक असल्याचे निकालात नोंदवले आहे. त्यामुळे या विषयाच्या आडून धनंजय मुंडे यांची बदनामी करणाऱ्यांना उच्च न्यायालयाने जोरदार चपराक लगावली आहे; असेच म्हणावे लागेल.

----------

### परळीत आठ लाखांचे

केकान, नाईक पोलीस कॉन्स्टेबल गोविंद भताने, तसेच पोलीस कॉन्स्टेबल सचिन आंधळे यांनी केली याप्रकरणी परळीच्या संभाजीनगर पोलिस ठाण्यात गु.र.नं. १५५/२५ कलम ३०३(२), ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून फरार आरोपींचा शोध सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले .

------------

### २० लाखांचा गुटखा

गुटखा वानगाव शिवारातून धुळे-सोलापूर महामार्गावरून आणला जात आहे. त्यानुसार मध्यरात्री १ वाजता पोलिसांनी सापळा रचून संशय पिकअप अडवला. दरम्यान,पोलिसांचे वाहन पिकअप समोर थांबताच मागून येणाऱ्या स्विफ्ट कार (क्रं.एम.एच.०१ बी.टी.६१४४ ) ने पिकअप ला जोराची धडक दिली. त्यामुळे गोंधळ निर्माण झाला. कारच्या अपघातामुळे झालेल्या धावपळीत पोलिस कर्मचारी कार मधील व्यक्तींना पाहण्यासाठी गेले असताना, टेम्पोतील आरोपी गोंधळाचा फायदा घेत पळून गेले. त्यांचा पाठलाग करत असतानाच स्विफ्ट कारमधील व्यक्तीही पसार झाले.घटनेनंतर पोलिसांनी स्विफ्ट कारची तपासणी केली असता, कारमध्ये देखील गुटख्याचा साठा आढळून आला. या संपूर्ण कारवाईत पोलिसांनी टेम्पो व कार असा एकूण २० लाख ७१ हजार ६४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. रजनीगंधा, बाबा, विमल यांसारख्या बंदी घालण्यात आलेल्या ब्रँडचा गुटखा मोठ्या प्रमाणावर होता. नेकनूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

----------

### जलजीवनची सरकारकडे तब्बल

त्रासामुळे त्यांनी आयुष्य संपवण्याचा निर्णय घेतल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणानंतर सरकारवर जोरदार टीका होत आहे. सरकारकडून वेळेत बिल मिळत नसल्याने आत्महत्या केल्याचा आरोप महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघाने केला आहे. तर सरकारने वेळेत पैसे न दिल्याचे आरोप महायुतीच्या मंत्र्यांनी फेटाळले आहेत.मात्र आता जलजीवन मिशनच्या कामाची तब्बल ३५ हजार ६२२ कोटी रुपयांची थकबाकी असल्याचे समोर आले आहे. केंद्राकडून तब्बल १९ हजार २५९ कोटी रुपये येणे बाकी आहे. तर राज्य सरकारच्या वित्त विभागाकडून १६ हजार ३६३ कोटी रुपयांची थकबाकी असल्याचे समोर आले आहे.केंद्र आणि राज्यातील एकूण ३५ हजार कोटी रुपये जलजीवन मिशनचे थकले आहेत. मागील वर्षी ऑक्टोबर २०२४ पासून केंद्राचा एकही रुपया जलजीवन मिशनचा राज्याला आलेला नाही. जलजीवन मिशनसाठी राज्याचा ३५ हजार कोटी रुपयांचा आराखडा आहे. २०२४ मध्ये जलजीवन मिशनसाठी केंद्राकडून पाच हजार कोटी तरतूद केली होती. मात्र, त्यापैकी फक्त १६०० कोटी रुपये देण्यात आले आहेत.

**पैसे कधी वर्ग होणार?**

१६ जूनला केंद्राने प्रत्येक राज्याला पत्र लिहून जलजीवन मिशनसाठी सध्या राज्य सरकारने तरतूद करावी, असे म्हटले आहे. महाराष्ट्रात लाडकी बहीण योजनेमुळे हे पैसे वर्ग करण्यात आलेले नाहीत. पाणीपुरवठा विभागाने जलजीवन मिशनसाठी ३९०० कोटी रुपये मिळावेत, असे पत्र वित्त विभागाला पाठवले आहे. मात्र, त्यावर अद्याप कोणताही निर्णय झालेला नसल्याची माहिती समोर आहे.

**राज्यात ५२ हजार कोटीची कामे**

जलजीवन मिशनची राज्यात एकूण ५२ हजार कोटी रुपयांची कामे होती. त्यापैकी २५ हजार ६०० कोटी रुपयांची कामे पूर्ण झाली आहेत. म्हणजेच जवळपास ५० टक्के कामे अजूनही अपूर्ण आहेत. केंद्र आणि राज्य सरकारकडून पैसे नसल्यामुळे अनेक कामे अर्धवट आहेत. केंद्र सरकारने सुरू केलेल्या जलजीवन मिशन योजनेची मुदत मार्च २०२५ रोजी संपली आहे.याची मुदत २०२८ पर्यंत वाढवण्यात आली आहे.

------------

### बस-दुचाकीच्या भीषण

आलेल्या बसने त्यांना जोरदार धडक दिली. बसचा क्रमांक - १४ ७९६२ असा आहे. बाळू केशव वायकर आणि त्याची पत्नी लता बाळू वायकर हे धडकेनंतर रस्त्यावर दूर फेकले गेले आणि गंभीर दुखापतीमुळे जागीच त्यांचा मृत्यू झाला. सदरील बस ही नांदेड कडून पुण्याकडे जात असताना अपघात झाला. यात दोघेही जागेवर ठार झाले आहेत. पोलिसांना घटनेची माहिती मिळताच ते घटनास्थळी दाखल झाले. दाम्पत्याचे मृतदेह ताब्यत घेतले आणि पोस्टमॉर्टमसाठी रुग्णलयात पाठवले या प्रकरणी बस चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

-------------

### महसुलच्या दांडीबहाद्दरांना

म्हणजे महसूल कर्मचाऱ्यांचे ऑगस्ट महिन्यातील वेतन फेस अ‍ॅपवर नोंदणी केलेल्यांनाच मिळणार आहे. त्यामुळे, महसूल कर्मचाऱ्यांना दररोज कार्यालयात जाऊन आपली फेस रीडिंग नोंदणी करावी लागेल, अन्यथा नोंदणी न झालेल्या दिवशी उपस्थिती नसल्याची नोंद होईल.

केंद्र सरकारने महसूल विभागाच्या सर्व कर्मचाऱ्यांसाठी फेस अ‍ॅप आणि जिओ-फेन्सिंग प्रणाली अनिवार्य केली असल्याने कर्मचाऱ्यांची उपस्थिती आता कार्यालयातूनच नोंदवली जाणार आहे. त्याप्रमाणे राज्यातही फेस नोंदणी करणे बंधनकारक केले आहे. त्यामुळे ऑगस्ट महिन्याचा पगार (सप्टेंबरमध्ये मिळणारा) केवळ फेस अ‍ॅपवर नोंदणी केलेल्या कर्मचाऱ्यांनाच मिळणार आहे. याबाबतचा स्पष्ट शासन निर्णय लवकरच काढला जाणार आहे, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याबाबतचे आदेश दिले आहेत. महसूल मंत्र्यांकडून रायगड जिल्ह्यातील महसूलच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला. त्यावेळी हे आदेश दिले आहेत.

**फेस अ‍ॅपवर नोंदणी केली तरच पगार**

तलाठी ते उपजिल्हाधिकाऱ्यापर्यंत सर्वांनाच फेस अ‍ॅपवर नोंदणी बंधनकारक असून ज्या गावात नोकरी आहे, तिथे जात उपस्थिती लावावी लागेल. तसेच, महसूल कर्मचाऱ्यांची आता त्यांच्या कार्यालयात उपस्थिती आवश्यक असणार आहे. तर, नोंदणी न केल्यास त्या दिवशी उपस्थिती नाही, असे समजण्यात येईल. त्यामुळे, तलाठी ते उपजिल्हाधिकाऱ्यांपर्यंत सर्वच महसूल कर्मचाऱ्यांना कार्यालयात दररोज यावे लागणार आहे. ज्या दिवशी गैरहजेरी असेल त्या दिवसाचा पगार दिला जाणार नाही.

------------

### वयोवृद्ध रुग्णाच्या मुलाला

येथून डोळ्याच्या उपचारासाठी आलेल्या महिला रुग्णाच्या मुलाला मारहाण करताना मारू नका अशी विनंती करत होती.. तरीदेखील हे मारहाण करत होते.. आजूबाजूच्या नागरिकांनी धाव घेतल्यानंतर मारहाण करणारे निघून गेले. शुल्लक कारणावरून रुग्णाला व त्याच्या नातेवाईकाला मारहाण करत हॉस्पिटल मधील स्टाफ ची मुजोरी दिसून आली या संदर्भात संताप व्यक्त केला जात असून. डॉक्टरांनी या संदर्भात खुलासा करणे व अशा मजूर स्टाफवर कारवाई करावी अशी मागणी केली जात आहे.पण हे खरेच स्टाफ मधील कर्मचारी होते का याची पुष्टी होऊ शकली नसली तरी रुग्णालयात मारहाण झाली हे तेवढेच सत्य आहे

------------

### ना.पंकजाताई मुंडेंना

भाजपचे कार्यकर्ते चंद्रकांत फड, विष्णू घुले, भारत तोंडे यांनी पंकजाताईंना वाढदिवसानिमित्त ही अनोखी भेट दिली. बुधवारी रामटेक बंगल्यावर पंकजाताईंनी गायीचे औक्षण व पूजन करून स्वागत केले. राधा व कृष्ण अशी गाय-बैलाची ही जोडी आहे. दोन्हीच्या पाठीवरून पंकजाताईंनी मायेने हात फिरवला व त्यांना चाराही दिला. कार्यकर्त्यांनी दिलेली ही भेट खरच अनोखी आहे, ही भेट कायम स्मरणात राहील असं त्या म्हणाल्या. यावेळी मुलगा आर्यमानसह उपस्थित सर्व सहकाऱ्यांसोबत पंकजाताईंनी गोमाता आगमनाचा आनंद साजरा केला.

---------------

### खासगी वैद्यकीय महाविद्यालयांमध्य

सरकारी, सरकारी अनुदानित, पालिका, अल्पसंख्याक वगळता खासगी विनाअनुदानित वैद्यकीय कॉलेजांमध्ये हे आरक्षण असेल.

--------------------

**टी.सी.हरवला आहे**

राठोड कृष्णा सुंदर या नावाचा बीएससी तृतीय वर्ष पासचा टी. सी नाळवंडी ते बीड प्रवासादरम्यान हरवला आहे. तरी ज्या कोणाला सापडल्यास खालील नंबर वर संपर्क साधा.

-::संपर्क::-

मो.७४४७२०१०८९

cmyk


# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शुक्रवार दि. २५ जुलै २०२५




## थोडक्यात...



### नोंदणीकृत गोशाळांना नोंदणी प्रमाणपत्र वितरण समारंभ

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र गोसेवा आयोग महाराष्ट्र शासन व पशुसंवर्धन विभाग महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दिनांक २३ जुलै २०२५ रोजी पशुसंवर्धन आयुक्त कार्यालय बीड येथे बीड जिल्ह्यातील एकूण ५३ नोंदणीकृत गोशाळांचे नोंदणी प्रमाणपत्र वितरणाचा कार्यक्रम महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे शासकीय सदस्य श्री उद्धवजी नेरकर व डॉ. दिलीप मोरे यांच्या हस्ते सदर प्रमाणपत्र वितरणाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या वतीने बीड जिल्ह्यातील गोशाळांना नोंदणी प्रमाणपत्र वितरण सोहळ्याचे आयोजन बीड शहरातील सुभाष रोडवरील पशुसंवर्धन विभागाच्या कार्यालयात करण्यात आले होते.या कार्यक्रमास प्रमुख अतिथी मा उध्दवजी नेरकर, सदस्य ,महाराष्ट्र गोसेवा आयोग, महाराष्ट्र राज्य डॉ आर डी कदम, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त बीड डॉ दिलीप मोरे, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन बीड , श्री बाजीराव ढाकणे,बीड जिल्हा समन्वयक, महाएनजिओ फेडरेशन, महाराष्ट्र राज्य डॉ देशपांडे यांच्यासह बीड जिल्ह्यातील गोशाळेचे संचालक यांची उपस्थिती होती. सर्व ५३ गोशाळा संचालकांना नोंदणी प्रमाणपत्र देण्यात आली.



### राजस्थानी विद्यालयात माता पालक व पालक शिक्षक संघाची स्थापना

बीड । प्रतिनिधी

पेठ बीड मधील राजस्थानी सेवा समाज संचलित मदनलाल सारडा राजस्थानी प्राथमिक विद्यालयात माता पालक व पालक शिक्षक संघाची स्थापना व बैठक संपन्न झाली या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक सोहनी सर तर प्रमुख पाहुणे म्हणून महेश लड्डा व गोविंद फावडे उपस्थित होते. व माता पालकातून सौ संगीता ताई शिंदे या होत्या. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिराळकर सर यांनी केले प्रस्ताविकात त्यांनी माता पालक व पिता पालक संघाची आवश्यकता शाळेत का असते याचे प्रतिपादन केले. शाळेत चालणाऱ्या विविध विभागांची माहिती माता पालक व पिता पालकांना व्हावी यासाठी सर्व प्रथम श्री.लड्डा सर यांनी सांस्कृतिक विभागा मार्फत शाळेत घेतले जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली त्यामध्ये शाळा प्रवेशोत्सव तसेच पेठ बीड मधील आकर्षक अशी बाल दिंडी कशी साजरी केली हे यावेळी पालकांना सांगितले तसेच शाळेत झालेल्या जयंती पुण्यतिथी यांची माहिती दिली. तसेच आगामी काळात सांस्कृतिक विभाग कोणते कोणते कार्यक्रम घेणार आहे याची सविस्तर रूपरेषा सादर केली. तसेच कब बुलबुल पथकाचे कार्य तसेच शाळेतील ढोल व लेझीम पथक याची सविस्तर माहिती या वेळी सांगण्यात आली.श्री तंबरे सर यांनी शालेय शिस्त*तसेच आगामी काळात जाणाऱ्या परिसर सहलीसंदर्भात माहिती यावेळी विषद केली सौ.जाधव मॅडम यांनी शाळेतून भरल्या जाणाऱ्या विविध शिष्यवृत्ती योजनांची माहिती सांगितली त्यामध्ये अस्वच्छ व्यवसाय शिष्यवृत्ती, अपंग शिष्यवृत्ती, सुवर्ण महोत्सवी आदिवासी शिष्यवृत्ती योजना माहिती सांगितली.अध्यक्ष समारोप करताना मुख्याध्यापक सोहनी सर म्हणाले की शाळेच्या जडणघडणी साठी माता पालक व पालक शिक्षक संघाची स्थापना करणे गरजेचे असते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विभाग प्रमुख सौ बियाळे मॅडम केले तर आभार प्रदर्शन सौ तौर मॅडम यांनी मानले . यावेळी पालक प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते . या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक - शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## रोजगार मेळाव्यात ७५ उमेदवारांची निवड

जालना । प्रतिनिधी

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर, जालना अणि मोरेश्वर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, भोकरदन यांचे संयुक्त विद्यमाने मंगळवार दि २२ जुलै, २०२५ रोजी मोरेश्वर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय भोकरदन येथे ''पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा ''संपन्न झाला. या रोजगार मेळाव्यात एकुण २५९ उमेदवारांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १४४ उमेदवार प्रत्यक्ष मुलाखतीस सहभागी झाले होते. यामध्ये १२१ पुरुष तर २३ महिलांचा समावेश आहे. या रोजगार मेळाव्यात परीसरातील एकुण ७५ उमेदवारांची विविध पदांसाठी आस्थापनांव्दारे प्राथमिक निवड करण्यात आली. यामध्ये छत्रपती संभाजीनगर व जालना येथील एकुण १२ नियोक्ते उपस्थित होते यामध्ये ६७ पुरुष व ८ महिला असे एकुण ७५ उमेदवारांची प्राथमिक निवड झाली.

# कुरेशी समाजाच्या लोकांविरुध्द होत असलेल्या खोट्या कारवाईचा निषेध

## आष्टी तहसील कार्यालयावर कुरेशी समाजाचा मोर्चा,उपजिविकेचे प्रश्न मार्गी लावा तहसीलदारांकडे निवेदनाद्वारे मागणी

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील कुरेशी समाज यांचा वडीलोपार्जीत जनावरे खरेदी विक्रीचा व्यवसाय करीत आहे व शेती व्यवसाय करीत आहे. व स्वतःची व कुटुंबीयांची उपजिवीका भागवीत आहे. पण कुरेशी समाज हा शासनाने निबंध घातलेले कोणतेही जनावर खरेदी विक्री कटींग करीत नाही तसेच शासनामार्फत जे जनावरांचे बाजार आहे त्यातुनच सर्व प्रक्रिया करून व्यवसाय करीत आहे.काही गुंड प्रवृत्तीचे लोक आपली पोळी भागविण्याकरीता कुरेशी समाजाला टार्गेट करून व्यवसाय करू देत नाही व खंडणीची मागणी करीत आहे समाजाच्या लोकांना अडवणुक करून त्यांचे कडील जनावरे हिसकावुन घेत आहे तसेच त्यांचे कडील पैसे देखील हिसकावुन घेत आहे व जबर मारहाण करून दहशत निर्माण करीत आहे त्यामुळे कुरेशी समाजाला



कामधंदा करणे व शेती व्यवसाय करणे शक्य राहीले नाही व शासन दरबारी कोणी दखल घेत नाही व कुरेशी समाजाचे लोकांनवर उपासमारीची वेळ आली आहे. गुंड संघटना पोलीस यंत्रनेवर दबाव आणुन कुरेशी समाजाचे लोकांचा काहीएक दोष नसतांना खोटे गुन्हे दाखल करून घेण्यास दबाव आणत आहे व त्याचे दबावापोटी पोलीस यंत्रना कसलीही सहानिशा न करता त्यांच्या वर खोटे गुन्हे दाखल करू अशा धमक्या देतात तसेच कुरेशी समाजातील लोकांनी त्यांना झालेल्या मारहाणी बाबत तकार पोलीस स्टेशन येथे दिली तर त्याची तक्रारही घेतली जात नाही आमचे संविधानीक हक्क व अधिकार सर्व धोक्यात आलेले आहे.याबाबत आष्टी तहसील कार्यालयावर कुरेशी समाजांच्या वतीने मंगळवार दि २२ जूलै रोजी दुपारी भव्य मोर्चा काढण्यात आला यावेळी तहसीलदार वैशाली पाटील यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

तालुक्यातील काही गावांमध्ये कुरेशी समाजावर सतत अन्याय होत आहे व कुरेशी समजाच्या अडी अडचणी कोणीही शासन दरबारी दखल घेत नाही व त्यामुळे कुरेशी समाजाचे संविधानिक हक्क व अधिकार धोक्यात आलेले आहे शासनाचे कुरेशी समाजाकडे पुर्णपणे दुर्लक्ष केले ते न करता कुरेशी समाजाचे समस्या जाणुन घ्यावे व त्याचे अन्न व उपजिविकेसाठी योग्य तो निर्णय घ्यावा त्याचे अडीअडचणी समजुन घ्यावे त्याचे निवारण करावे त्यासाठी सदरचे निवेदन तहसीलदार यांच्या शासन दरबारी दिले आहे.या मोर्चात माजी नगरसेवक तथा हाजी सादीक कुरेशी,शाकीर कुरेशी,वहाब कुरेशी, इरफान कुरेशी,तय्यब कुरेशी,राजु सौदागर, अन्सार कुरेशी,रऊफ कुरेशी, माजी ग्रामपंचायत सदस्य शफ्फी कुरेशी,सिराज कुरेशी,आयाज कुरेशी,शरीफ कुरेशी,शारूख कुरेशी,दौलावडगाव येथील माजी उपसरपंच बबलू कुरेशी,खडकत येथील ग्रा प सदस्य मौहमद कुरेशी आदी मोठ्या संख्येने आष्टी तालुक्यातील कुरेशी समाज बांधव सहभागी झाले होते.यावेळी कुरेशी समाजांच्या मोर्चाला रिपाइं आठवले गटांचे तालुकाध्यक्ष अशोक साळवे यांनी पाठिंबा दिला.

**कुरेशी समाजावर उपासमारीची वेळ आल्यामुळे मायबाप सरकारने सर्व समाजाची समस्या दुर करावी व योग्य ते निर्देष संबंधीतास दयावे व आमच्या गरीबांवर का अन्याय करता मोठ मोठ्या कंपनीवर कारवाई करावी व बाहेर देशात जो निर्यात होतो त्यांना थांबावे व आमच्या गरीबांवर होणारा अन्याय थांबवा आणि शासनाने आम्हाला न्याय मिळवून द्यावा**

**- माजी नगरसेवक तथा हाजी सादीक कुरेशी आष्टी**

# पोखरा अंतर्गत स्वयंसेवकांचे प्रशिक्षण

अंबाजोगाई प्रतिनिधी

दीनदयाल शोध संस्थान कृषि विज्ञान केंद्र अंबाजोगाई व कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा बीड यांच्या माध्यमातून नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प (पोक्रा) टप्पा २ मधील निवडक स्वयंसेवकांचे तीन दिवसीय निवासी प्रशिक्षण कार्यक्रम (१७ ते १९ जुलै) संपन्न झाला. उद्घाटनप्रसंगी केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. वसंत देशमुख, पाणी फौंडेशनचे प्रशिक्षक विनोद ठोंबरे, पोक्रा प्रकल्प विशेष तज्ञ दादासाहेब जळक, प्रशिक्षक ओंकार सुर्वे, श्रद्धा ठोंबरे, प्रविण खुळे यांची उपस्तिथी होती. प्रास्ताविक करताना डॉ. देशमुख यांनी सांगितले की, जिल्ह्यामध्ये पर्जन्याचे असमान वितरण, सरासरी पेक्षा कमी पर्जन्य अशी परिस्थिती दिसून येत आहे. अशा कठीण परिस्थितीत शेतकऱ्यांना हवामान अनुकूल पिकाचे व्यवस्थापन करता यावे, पिकाचे नुकसान पातळी कमी करता यावी यासाठी तंत्रज्ञान सुचवण्यासाठी पोक्रा




योजना कार्यान्वित केलेली आहे. ही योजना यशस्वी होण्यासाठी स्वयंसेवक महत्वाचा कार्यभार उचलु शकतात म्हणून स्वयंसेवकाचे प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या योजनेमधील तंत्रज्ञान विषयी काही समस्या असतील तर कृषि विज्ञान केंद्र, कृषी विद्यापीठ, कृषी विभाग येथील अधिकारी व शास्त्रज्ञ यांच्याशी संपर्क करावा, अशी माहिती त्यांनी दिली. जळक यांनी सांगितले की, हे पायलट प्रशिक्षण असून या नंतर जिल्यातील या प्रकल्प अंतर्गत निवडलेल्या १३५० स्वयंसेवकांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

प्रशिक्षण कार्यक्रमात विविध विषयावर पाणी फौंडेशनच्या विविध प्रशिक्षकांनी वेगवेगळे उपक्रम, सादरीकरण द्वारे मार्गदर्शन केले. समृद्धीची शिडी व माझ्या शेतीचा आरसा, हवामान बदलाचे परिणाम व शेतकऱ्याच्या मोठी समस्या, सह्याद्री फार्मचा प्रवास, स्मार्ट शेती: शेतीत फायदा व उगवण क्षमता तपासणी, एकात्मिक कीड व्यवस्थापन, आपण आपले पाणी किती चांगले साठवतो, वाटरशेड: संकल्पना आणि विकास, भूजल भावकी, जमिनीत सेंद्रिय कार्बनचे प्रमाण - महत्व, नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन, हवामान बदल आणि लोक चळवळ, माझ्या गावाला कोण बदलेल इत्यादी विषयावर सखोल मार्गदर्शन केले.

## धाराशिव तालुका अध्यक्षपदी सलीमभाई औटी यांची निवड

धाराशिव । प्रतिनिधी

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष सन्माननीय राज ठाकरे यांच्या आदेशानुसार आणि पक्षाचे नेते दिलीप बापू धोत्रे व सरचिटणीस संतोष भाऊ नागरगोजे यांच्या मार्गदर्शनाखाली, धाराशिव जिल्हाध्यक्ष राजेंद्र गपाट यांच्या अध्यक्षतेखाली सलीमभाई औटी यांची धाराशिव तालुका अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. या वेळी जिल्हा उपाध्यक्ष दत्ता बोंदर, धाराशिव विधानसभा अध्यक्ष गोपाळ घोगरे, धाराशिव शहर अध्यक्ष निलेश जाधव, जिल्हा सचिव अजय तांबिले, जिल्हा प्रवक्ते नागेश मोरे, परंडा तालुका अध्यक्ष सुरेश पाटील, वाशी तालुका अध्यक्ष अक्षय चेडे, रस्ते आस्थापना प्रमुख रविराज घाडगे, कळंब तालुका सचिव सूरज बुधवंत, विद्यार्थी सेना तालुका उपाध्यक्ष सूरज बोंदर आणि इतर मनसे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या निवडीनंतर सलीमभाई औटी यांनी ''राज साहेब ठाकरे यांच्या विचारांची प्रेरणा घेऊन धाराशिव तालुक्यामध्ये गाव तिथे शाखा हे धोरण राबवले जाईल आणि राजसाहेबांचे विचार गावागावांमध्ये पोहोचवण्याचे कार्य झपाट्याने केले जाईल,'' असे सांगितले.

पान ६ वरून...

### ग्राहक सेवा केंद्रातील

विश्वासघात करून स्वतःच्या नातेवाईकांच्या मदतीने रक्कम परस्पर ट्रान्सफर करून फसवणूक केली असल्याचे शरद चव्हाण यांनी फिर्यादीत नमूद केले आहे. सदरील फिर्यादीवरून किरण जोगदंड याच्या विरुद्ध अंबाजोगाई शहर ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा नोंदवण्यात आला. पुढील तपास संबंधित तक्रारीनंतर अंबाजोगाई शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलीस उप निरिक्षक ज्ञानेश्वर कांबळे करत आहेत.

### शेतकरी कर्जमाफीसाठी मेंढ

जोरकस पणे मांडण्यासाठी दोन तास चक्काजाम आंदोलन केले आहे या आंदोलनामध्ये नेते मा भाई गगाभिशन थावरे,शेकापाचे नेते ॲड नारायण गोले पाटील,काँग्रेसचे तालुकाप्रमुख नारायण होके पाटील,आझाद क्रांती सेनेचे राजेश घोडे,शेतकरी क्रांती सेनेचे योगेश कानडे,वीर शंभू संघटनेचे गणेश शिंदे,आजाद क्रांतीचे तालुकाध्यक्ष अशोक ढगे, मौलाना आझाद युवा मंचचे जिल्हाध्यक्ष नुमान चाऊस व पदाधिकारी तसेच आजी माजी सैनिक संघटनांनी वसंतराव नाईक चौक परभणी फाटा माजलगाव येथे येऊन चक्काजाम आंदोलनात सहभागी होऊन जाहीर पाठिंबा दिला हे आंदोलन माजलगाव प्रहार जनशक्तीचे तालुका अध्यक्ष गोपाळ पैजणे,नितीन कांबळे,भारत डोंगरे,हरिचंद्र जाधव,विजय जोगडे,अशोक अर्जुन,लक्ष्मण गरड,विकास जगताप,विलास लवाळे,श्रीराम कोरडे,युवराज राठोड,महादेव डाके,पांडुरंग कुकडे,गणेश नागणे,अनेक शेतकरी व दिव्यांग बांधव पदाधिकारी उपस्थित होते

### विद्यार्थीनीना त्रास देणाऱ्या

आंधळे, आनील नेहरकर , रंजीत जाधव, अमोल पांचाळ,संतोष शिदे सह तालुक्यातील पालक,कार्यकर्ते यांनी दिला आहे या निवेदनाच्या प्रती माननीय मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्रजी फडणविस,मा.ना. पंकजाताई मुंडे साहेब, पर्यावरण व पशुसवर्धन मंत्री,हंसराज अहिर, ओ.बी.सी. आणि मागासवर्गीय आयोग भारत सरकार,.आ. प्रकाश दादा सोळंके, आमदार विधान सभा माजलगांव मतदार संघ,. मा. पोलीस अधिक्षक साहेब बीड,उपविभागीय अधिकारी साहेब, उप विभाग माजलगांव यांना पाठविण्यात आले आहेत.

### भंगार वाहनांतूनच विद्यार्थ्यांची

शहरातील जुन्या गाड्यांची ग्रामीण भागामध्ये होतेय विक्री

येत असल्याचे वास्तव आहे. मोठ्या शहरांत अशा कालबाह्य स्कूल बसवर कार्यवाही केली जाते, म्हणून काही दलाल ही वाहने ग्रामीण भागात कमी किंमतीत आणून विकतात. स्वतःच्या स्वार्थापोटी शाळकरी मुलांच्या जीविताशी खेळ सुरू आहे. या वाहनांचे स्ट्रक्चरल ऑडिट कुणी करत नाही. आरटीओ त्यांची कागपत्रे तपासत नाहीत. विद्यार्थी घेऊन जाणाऱ्या अनेक वाहन चालकांकडे तर वाहनाची कागदपत्रेही नाहीत. काही वाहन चालकांकडे इन्शुरन्स नाही. हे तपासायला कुणी रस्त्यावर येत ही नाही, याचे आश्चर्य व्यक्त होत आहे. आरटीओ विभाग व पोलिस प्रशासनाने या गंभीर प्रकाराची वेळीच दखल घ्यावी. कालबाह्य झालेली वाहने आरटीओंनी जप्त करून नियमानुसार क्षमतेपेक्षा ज्यास्त मुलांची वाहतूक करणाऱ्या वाहन चालकांविरुद्ध कठोर कार्यवाही करणे गरजेचे आहे. याबाबत त्वरित कार्यवाही न झाल्यास मनसे शेतकरी सेनेतर्फे आंदोलन करण्यात येणार आहे.

-कैलास दरेकर, जिल्हाध्यक्ष, मनसे शेतकरी सेना

### महानगरपालिकेवर भगवा

कसा होईल यासाठी आतापासून जोमाने कामाला लागावे असे आवाहन उपस्थित सर्व प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना आमदार खोतकर यांनी व्यक्त केले.

याप्रसंगी जिल्हा संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर, सहसंपर्क एडवोकेट सुनील किनगावकर, शिवसेना शहरप्रमुख विष्णूभाऊ पाचफुले, गणेशसेठ राऊत, उपजिल्हाप्रमुख संतोष मोहिते, उपजिल्हाप्रमुख गणेश सुपारकर, योगेश रत्नपारखे, दीपक वैद्य, अल्पसंख्यांक शहर प्रमुख जफर खान, दिनकर घेंवंदे, मेघराज चौधरी,राहुल हिवराळे, महेश दुसाने, सविता केवंडे, विजया चौधरी, यांच्यासह शहरातील सर्व आजी-माजी नगरसेवक, विभाग प्रमुख,उप विभाग प्रमुख, महिला आघाडी,दलीत आघाडीचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### हॉर्टिकल्चर एक्सपोर्ट प्रशिक्षणासाठी

इम्पोर्ट- एक्सपोर्ट कायदे, फूड सेफ्टी स्टँडर्ड, भांडवली गुंतवणूक, लॉजिस्टिक्स आणि कोल्ड चेन व्यवस्थापन याविषयी विस्तृत मार्गदर्शन केले.'हॅलो किसान' कंपनीचे प्रतिनिधी आकाश गर्जे यांनी आपला अनुभव व्यक्त करताना सांगितले की, ''आम्हाला या प्रशिक्षणामुळे जागतिक व्यापार प्रक्रियेचा संपूर्ण अभ्यास करता आला. आम्हाला आमच्या उत्पादक शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवायचे आहे आणि निर्यात ही त्यासाठीची मोठी संधी आहे. शासनाचे व कृषी विभागाचे आभार की त्यांनी आम्हाला ही संधी दिली.'' या प्रशिक्षणाद्वारे सहभागी कंपन्यांनी ना केवळ निर्यात प्रक्रियेबाबत ज्ञान मिळवले, तर अनेक नव्या संधी व उद्योगांच्या कल्पना समजून घेतल्या. जागतिक बाजारपेठेत प्रवेश करताना कोणत्या बाबींची विशेष काळजी घ्यावी लागते, कोणत्या देशांना कोणत्या प्रकारचे उत्पादन जास्त प्रमाणात लागते, पॅकेजिंगपासून ते डिलिव्हरीपर्यंतची गुणवत्ता कशी राखावी हे सारे प्रशिक्षणाद्वारे स्पष्ट झाले.या उपक्रमामध्ये सहभागी झालेल्या कंपन्यांनी एकमताने सांगितले की, अशा प्रकारच्या व्यावसायिक प्रशिक्षणामुळे कृषी उत्पादक कंपन्यांचे क्षितिज अधिक व्यापक होते आणि त्यांना स्थानिक मर्यादांपलीकडे जाऊन आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये आपली ओळख निर्माण करण्याची संधी मिळते.कृषी विभागाच्या या उपक्रमाचे राज्यभरातून कौतुक होत असून, भविष्यात अधिकाधिक कंपन्यांना याचा लाभ मिळावा, अशी अपेक्षा सहभागी कंपन्यांनी आणि शेतकरी संघटनांनी व्यक्त केली आहे. या प्रशिक्षणामधून तयार झालेली एक्सपोर्ट रेडी टीम ही महाराष्ट्रासाठी एक नवा निर्यात यशोगाथा लिहिणार, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# इट येथे अशोक लोढा यांच्या हस्ते शालेय साहित्य व कापडी पिशव्यांचे वाटप

बीड । प्रतिनिधी

लोकनेत्या व पर्यावरण मंत्री नामदार पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा पंधरवडा उपक्रमांतर्गत बीड तालुक्यातील इट येथील जिल्हा परिषद शाळेत विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात वृक्षारोपण, विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप व पर्यावरणपूरक कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले.

उपक्रमाचे आयोजन उपसरपंच गणेश लांडे पाटील यांच्या पुढाकाराने करण्यात आले. वृक्षारोपण व साहित्य वितरण भाजपा शहराध्यक्ष मा. अशोक शेठ लोढा यांच्या हस्ते करण्यात आले.पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या प्लास्टिक बंदी अभियानाला पाठिंबा देत, ग्रामीण



भागात जनजागृतीसाठी कापडी पिशव्यांचे वितरण करण्यात आले. पर्यावरण पूरक जीवनशैलीकडे वाटचाल करण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.गणेश लांडे पाटील म्हणाले, ''मा. पंकजाताई मुंडे यांच्या आशीर्वादाने आम्ही समाजहिताची कामे करत आहोत. शिक्षण, पर्यावरण आणि स्वच्छता या विषयांवर खेड्यापाड्यांत जागृती घडवण्याचा आमचा प्रयत्न आहे.''या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून भाजपा तालुका अध्यक्ष मा. विठ्ठल नाना शिंदे, गणेश भोसले, गणेश डोईफोडे, सखाराम डोईफोडे, हनुमान डोईफोडे, बिबीषिन डोईफोडे, पुरुषोत्तम डोईफोडे, भारत नर्णाले, परमेश्वर डोईफोडे, मुकुंद भोसले, मा. सरपंच गोरख डोईफोडे व बंडू वाजे आदी मान्यवर उपस्थित होते.शाळेचे मुख्याध्यापक मुरकूटे सर व त्यांच्या सहकारी शिक्षकवर्गाने उपक्रमाच्या आयोजनात मोलाचे योगदान दिले. ग्रामस्थ, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आले.

# मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्पाला सत्ताधारी आमदाराचा विरोध

वडवणी प्रतिनिधी,

वडवणी तालुक्यातील कुपा येथे इंदिरानगर मध्ये गट क्रमांक १०४ मधील गायरान जमीनमधला मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्प एम एस सी बी सोलार ॲग्रो प्रा ली साठी हस्तांतरित केलेला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना २४ तास लाईट उपलब्ध असणार आहे. त्याचबरोबर वेळेच्या वेळेला लाईट असल्यामुळे पाणी मिळणार आहे या प्रकल्पाचा फायदा सर्वसामान्य शेतकरी शेतमजूर कामगार व गावकऱ्यांसाठी अति महत्त्वाचा आहे. परंतु माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश सोळंके यांनी मुद्दामहून हा प्रकल्प रोखला आहे आशी चर्चा ऐकायला मिळत आहे. मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्पाला सत्ताधारी आमदारांचा विरोध असल्याने सरकारला घरचा आहेर असं म्हणलं तर वावगं ठरणार नाही.या भागातील शेतकऱ्यांसाठी त्यांची किती धडपड आहे हे यावरून सिद्ध होते. एवढेच नव्हे तर त्यांनी कलेक्टर, डेप्युटी कलेक्टर, तहसीलदार यांना पत्र देऊन हा प्रकल्प रद्द करण्याची मागणी केलेली आहे. परंतु या प्रकल्पामुळे याच गावातील परिसरातील शेतकरी सर्वसामान्य माणसाला २४ तास वीज मिळणार आहे. आणि २४ तास वीज मिळाल्यामुळे वेळेच्या वेळेला पाणी सुद्धा मिळणार आहे. मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्प सरकारने या ठिकाणी बनवण्याचा निर्णय घेतला परंतु त्याला विरोध सत्तेमधील असलेले स्थानिक आमदार प्रकाश सोळुंके यांनी केल्याने या ठिकाणी शेतकऱ्यांचं मोठं नुकसान होणार आहे. आणि हे नुकसान होऊ नये म्हणून हा प्रकल्प होणे अति महत्त्वाचे आहे.

शेतकऱ्यांना दिवसा अखंडित वीज पुरवठा करणे करिता मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचा ड्रीम प्रोजेक्ट सत्ताधारी पक्षाचे सहकारी आमदारच जाणीवपूर्वक विरोध करत आहेत का?. मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्पासाठी मुख्यमंत्री महोदयांच्या नेतृत्वाखाली दर महिन्याला बैठक घेतली जाते. पालकमंत्री अजितदादा पवार सुद्धा दर महिन्याला मीटिंग घेतात. सरकारी योजनेला सरकारच्याच आमदारांचा घरचा आहेर म्हणायचा का? याबाबत उलट सुलट चर्चेला उधाण आले आहे.

# माजलगाव शहर भाजपाने आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

माजलगाव । प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टी माजलगाव शहर मंडळच्यावतीने महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महाराष्ट्राच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसा निमित्त दि २२ जुलै २०२५ रोजी शहरातील गणपती मंदिर जुना मोंढा माजलगाव येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या रक्तदान सोहळ्याच्या उद्घाटन प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व नामदार पंकजा मुंडे यांना उत्तम आरोग्य उदंड आयुष्य लाभो व त्यांच्या हातून असेच जनसेवा घडत राहो अशी विघ्नहर्ता बुद्धी दाता गणपतीची पूजा व प्रार्थना करून करून या रक्तदान शिबिराचे अध्यक्ष डॉ.शंकर जुजगर,प्रमुख पाहुणे डॉक्टर मधुकर घुबडे,विष्णू मुंदडा यांनी श्रीफळ वाढवून फित कट करून रक्तदान शिबिराचे उद्घाटन केले. तसेच छत्रपती शिवाजी महाराज व लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या प्रतिमेचे पूजनही करण्यात आले. याप्रसंगी उपस्थित सर्व मान्यवरांचां सत्कार केला.या रक्तदान शिबिराचे प्रास्ताविक भारतीय जनता पार्टीचे मंडळ शहराध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी केले या प्रस्तावितपर मनोगत



व्यक्त करताना रत्नपाररखी म्हणाले कुठलेही बॅनरबाजी न करता रक्तदान शिबिर आयोजित केले व दि.२६ जुलै रोजी महात्मा फुले शाळेत शालेय साहित्य वाटप,गो शाळेत जाऊन त्या ठिकाणी गोमातेची सेवा करून गाईला लंपी लस दिली जाणार असून , वृक्षारोपण, पालावरील गरजू कुटुंबाला किराणा वाटप,हनुमान मंदिर व माजलगावचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर मंदिरामध्ये पूजा व महारती करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व नामदार पंकजा मुंडे यांचा वाढदिवस विविध सामाजिक व धार्मिक पद्धतीने संपन्न होणार आहे. शिबिराचे अध्यक्ष डॉ.जूजगर म्हणाले वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिरासह विविध सामाजिक धार्मिक उपक्रम घेत आहात त्याबद्दल अभिनंदन करून शहराध्यक्ष विनायक रत्नपारखी यांचे कौतुक केले. यावेळी अनेक रक्तदात्यांनी रक्तदान केले यावेळी पूर्ण वेळ थांबून त्यांचे अभिनंदन केले.व त्यांनी रक्तदान केल्याबद्दल भाजपा प्रदेश कार्यालयातून आलेले प्रमाणपत्र दिले.या रक्तदान शिबिरास भारतीय जनता पार्टीचे अरुण राऊत, डॉ.प्रशांत पाटील, अशोक तिडके, अभय होके, जगदीश चांडक, सत्यनारायण उनवणे, ज्ञानेश्वर माऊली सरवदे, ईश्वर खुरपे, अविनाश कांडुरे, बाळासाहेब क्षीरसागर,आनंद कुलकर्णी,उमेश जाधव,रामेश्वर चव्हाण,सुभाष कांबळे,संतोष जाधव,विनोद लड्डा, गौरी देशमुख,पूजा मुंडकर,चित्रा पाठक,अनिता अलकुंटे,भरत जोशी, दत्ता क्षिरसागर,मनोज कोरडे,नामदेव मुळे, राम शिंदे,दत्ता महाजन,उमेश जेथलिया यासह नेतेगन पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते या कार्यक्रमाची सूत्रसंचलन कैलास खुरपे यांनी केले व आभार प्रदर्शन पवन मोगरेकर यांनी केले.


तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

दुरध्वनी क्रमांक:०२४८३२७५०२६

E-Mail ID:-tahsildarambad@gmail.com

जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-८२ दिनांक-०३/०७/२०२५

**जाहीर प्रगटन**

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती लक्ष्मी प्रभाकर काळे रा.महाकाळा ता. अंबड जि. जालना यांचा मुलगा च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म / मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| | ओंकार प्रभाकर काळे | मुलगा | ०३/०९/२००८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक ०३/०७/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**

**तहसिलदार तथा**

**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**


cmyk

# राज्यात पीक कर्जाची थकबाकी तब्बल ३१ हजार २०० कोटी!

पुणे : राज्यामध्ये जेव्हा विधानसभा निवडणुकांची घोषणा झाली होती तेव्हा महायुतीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना कर्जमाफी करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. कालांतराने निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर प्रचंड अशा बहुमताने राज्याच्या सत्तेवर महायुतीचे सरकार आले. परंतु त्यानंतर मात्र कर्जमाफीच्या आश्वासनाची सरकारला आठवण पडली की काय अशी परिस्थिती निर्माण झाली व त्या पद्धतीचे वक्तव्य अनेक सत्ताधाऱ्यांकडून आले. जणू काही शेतकरी कर्जमाफीच्या मुद्द्यावर सरकारने यु टर्न घेतल्याचे दिसून आले. नुकत्याच संपलेल्या विधानसभेच्या अधिवेशनात कृषी कर्जमाफीसंबंधी आणि दीर्घकालीन उपाययोजना सुचवण्याकरिता सरकारने एक समिती नेमण्याची घोषणा केली.



विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर करण्यात आलेले आश्वासन मात्र काही दृष्टिकोनातून शेतकऱ्यांपासून तर बँकांपर्यंत अडचणीचे ठरले. सध्या जर आपण बघितले तर शेतकरी संघटना आणि विरोधी पक्षांकडून सातत्याने कर्जमाफीच्या आश्वासनासाठी पाठपुरावा केला जात असताना कर्जमाफी होईल की नाही याबाबत शेतकऱ्यांमध्ये गोंधळाचे वातावरण आहे. त्यामुळे शेतकरी कर्जमाफी होईल या आशेवर शेतकऱ्यांनी कृषी कर्जाची परतफेड केली नसून त्याचाच परिणाम म्हणून जूनअखेर राज्यातील पीक कर्जाची थकबाकी तब्ब्ल ३१ हजार २०० कोटीं रुपयांवर गेली आहे. सहकार विभागाच्या माध्यमातून मिळालेल्या माहितीनुसार राज्यात अल्प व मध्यम मुदतीचे एकतीस हजार दोनशे कोटी रुपयांचे कृषी कर्ज थकले असून याचा सगळ्यात मोठा फटका हा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना बसला आहे. नुसत्या जिल्हा बँकेचा थकीत कर्जाच्या रकमेचा आकडा पाहिला तर तो ८२०० कोटी रुपयांच्या घरात असून राष्ट्रीयकृत बँकांकडून थकबाकीचा आकडा १८७०० कोटी रुपये आहे. तसेच ग्रामीण बँका ८०० कोटी, खाजगी बँका ३००० कोटी अशा प्रकारे हे पीककर्ज थकबाकीचे आकडे आहेत व एकूण २०.३७ लाख कर्ज खात्यांची ही थकबाकी आहे.

महाराष्ट्राचा विचार केला तर दरवर्षी सरासरी ७० हजार कोटी रुपयांचे पिक कर्ज वितरित केले जाते. यामध्ये ६५ टक्के कर्ज राष्ट्रीयकृत बँका तर ३५ टक्के जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका देत असतात. तसेच सरकारकडून सवलतीच्या व्याजदरात कृषी कर्ज दिले जाते. परंतु सरकारच्या या आश्वासनांमुळे परतफेडीबाबत शेतकऱ्यांमध्ये आता गोंधळाचे वातावरण निर्माण झालेले आहे.त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी कर्जाची परतफेड न केल्यामुळे कर्जाचे प्रमाण वाढताना दिसून येत आहे. या सगळ्या परिस्थितीचा फटका बँकांना बसत असून राज्यातील अनेक जिल्हा बँकांची स्थिती देखील यामुळे नाजूक झालेली आहे. चांगल्या आर्थिक परिस्थितीत असलेल्या जिल्हा बँका देखील या पीक कर्जामुळे अडचणीत येतील की काय अशी भीती सध्या व्यक्त केली जात आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६४८ : आदिलशहाच्या आज्ञेवरुन मुस्तफाखान याने जिंजीनजीक शहाजीराजे यांना कैद केले.
१९१७ : कॅनडात आयकर लागू झाला.
१९४३ : दुसरे महायुद्ध इटलीत बेनिटो मुसोलिनीची हकालपट्टी झाली.
१९७८ : जगातील पहिली 'टेस्ट ट्युब बेबी' लुईस जॉन ब्राऊन, इंग्लंडमधील लँकेशायर येथे जन्माला आली.
१९८४ : सोव्हिएत संघाची स्वेतलाना साव्हित्स्काया अंतराळात 'चालणारी' प्रथम महिला अंतराळवीर बनली.
१९९२ : स्पेनमधील बार्सिलोना येथे २५ व्या ऑलिम्पिक स्पर्धांना सुरुवात झाली.
१९९४ : इस्त्राएल व जॉर्डनमधे १९४८ पासुन सुरू असलेले युद्ध अधिकृतरित्या समाप्त
१९९७ : इजिप्तचे अध्यक्ष मोहम्मद होस्नी मुबारक यांची १९९५ च्या आंतरराष्ट्रीय सामंजस्यासाठी दिल्या जाणार्या जवाहरलाल नेहरू

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१९९७ : के. आर. नारायणन भारताचे १० वे, पहिले दलित आणि पहिले मल्याळी राष्ट्रपती बनले.
१९९९ : लान्स आर्मस्ट्रॉंगने आपली पहिली टूर डी फ्रान्स सायकल शर्यत जिंकली.
२००७ : भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती म्हणून श्रीमती प्रतिभा पाटील यांचा शपथविधी
२०२० : द्रौपदी मुर्मू यांनी भारताचे १५ वे राष्ट्रपती म्हणून शपथ घेतली
१८७५ : जिम कॉर्बेट ब्रिटिश भारतीय वन्यजीवतज्ञ, शिकारी व लेखक (मृत्यू: १९ एप्रिल १९५५)
१९१९ : सुधीर फडके ऊर्फ 'बाबूजी' गायक व संगीतकार (मृत्यू: २९ जुलै २००२)
१९२२ : विश्वनाथ वामन तथा वसंत बापट कवी व संगीतकार (मृत्यू: १७ सप्टेंबर २००२)
१९२९ : सोमनाथ चटर्जी लोकसभेचे सभापती आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे नेते

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८८० : गणेश वासुदेव जोशी उर्फ 'सार्वजनिक काका' समाजसुधारक, राष्ट्रवादी विचारसरणीचे व स्वदेशी चळवळीचे प्रणेते आणि पुणे सार्वजनिक सभेचे संस्थापक (जन्म: ९ एप्रिल १८२८)
१९७७ : कॅप्टन शिवरामपंत दामले पुण्यातील महाराष्ट्रीय मंडळाचे संस्थापक, लष्करी शिक्षणाचे प्रसारक (जन्म:)
२०१२ : बी. आर. इशारा चित्रपट दिग्दर्शक आणि पटकथालेखक (जन्म: ७ सप्टेंबर १९३४)

# गाई-म्हशिंच्या डोळ्यातून पाणी येत असल्यास करा हे उपाय

गाईच्या डोळ्यातून पाणी येणे म्हणजे एक साधे लक्षण वाटते, पण त्यामागे अनेक गंभीर कारणे दडलेली असू शकतात. वेळेवर उपचार न केल्यास गाईच्या आरोग्यावर, उत्पादनक्षमतेवर आणि शेवटी शेतकऱ्याच्या उत्पन्नावरही परिणाम होऊ शकतो.

डोळ्यांतून पाणी येण्याची कारणे : डोळ्यात धूळ, परगळी, काड्या-कचरा गेलेला असणे. डोळ्यांमध्ये काही परके कण गेल्यास जनावराला अस्वस्थ वाटते आणि डोळ्यातून सतत पाणी वाहू लागते.

डोळ्यांचा संसर्ग : डोळे लालसर होतात, सुजतात, आणि पाणी येतं. हा संसर्ग एकापासून

दुसऱ्याला होऊ शकतो.

इन्फेक्शनमुळे डोळा दुखणे : अशा स्थितीत डोळ्याच्या आतील भागात इन्फेक्शन झाल्यामुळे डोळा पाणावतो.

कृमींचा परिणाम : काही वेळा फुफ्फुसात किंवा नाकात कृमी असतील, तर त्याचा त्रास डोळ्यांतून पाणी येण्यामार्फत दिसू शकतो.

माशी-मच्छर यांचा त्रास : डोळ्याभोवती माशा सतत बसल्यामुळे डोळ्यात जंतू जातात आणि त्यामुळे डोळे पाणावतात.परजीवी डोळ्याभोवती असणे : यामुळे इरिटेशन होऊन पाणी वाहू शकते.

ॲलर्जीक प्रतिक्रिया : काही नवीन खाद्यपदार्थ, गोठा स्वच्छ नसेल, रसायनांचा संपर्क यामुळे डोळ्यांची ॲलर्जी होऊन पाणी येऊ शकते.लक्षणे ओळखा : डोळ्यातून पाणी सतत येत असेल, डोळा सुजलेला/लालसर दिसत असेल, डोळ्याजवळ चोळणे किंवा डोकं झाडांना घासणे, डोळा अर्धवट बंद ठेवणे. खाण्याच्या व दूध देण्याच्या रुचीत बदल.

उपाय आणि काळजी : स्वच्छ पाण्याने डोळे हलक्या हाताने धुवा. गरज असल्यास स्वच्छ सुती कापड वापरा. व्हेटरिनरी डॉक्टरांचा सल्ला घ्या. डोळ्यांतून पाणी २ दिवसांपेक्षा जास्त येत असेल, तर डॉक्टरांकडून तपासणी करून औषधं सुरू करा.गोठा स्वच्छ ठेवा. धूळ, माशा, टिक यापासून संरक्षण होईल. माशी नियंत्रण उपाय करा. नेहमी कीटकनाशक फवारणी, लोळण औषध यांचा वापर करा. आहारात सुधारणा करा.



# सेंद्रिय शेतीसाठी जिवामृत ट्यूब ठरतेय फायद्याची

सेंद्रिय शेती ही आता पर्याय न राहता काळाची गरज बनली आहे. रासायनिक शेतीमुळे जमिनीत जीवसृष्टी नष्ट होत आहे, सुपीकता कमी होत आहे आणि उत्पादनाचा खर्च वाढत आहे. अशा परिस्थितीत सेंद्रिय शेतीकडे वळणारे शेतकरी वाढत आहेत. मात्र, सेंद्रिय शेतीत आवश्यक असणाऱ्या जीवामृताची वेळेत आणि योग्य प्रमाणात निर्मिती ही मोठी अडचण ठरते. हीच समस्या ओळखून विकसित करण्यात आले आहे, जीवामृत ट्यूब. हे एक अभिनव तंत्रज्ञान आहे, ज्याच्या मदतीने शेतकरी कमी वेळात, कमी मेहनतीत आणि कमी खर्चात अधिक गुणवत्तापूर्ण जीवामृत तयार करू शकतात.



जीवामृत का आवश्यक आहे : जीवामृत हे नैसर्गिक खत जमिनीत सूक्ष्मजीवांची संख्या वाढवते. हे सूक्ष्मजीव मातीतील पोषकतत्त्वांचा विघटन वेग वाढवतात, ज्यामुळे पिकांना सहज उपलब्ध होतात. याचा थेट परिणाम म्हणजे पिकांची मुळे अधिक बळकट होतात. पाने गडद हिरवी राहतात. रोगप्रतिकारक शक्ती वाढते. उत्पादनाचा दर्जा सुधारतो. तथापि, पारंपरिक पद्धतीने जीवामृत तयार करताना वेळ, जागा, सतत देखरेख आणि योग्य प्रमाण राखणे यासारख्या समस्या येतात. जीवामृत ट्यूब या समस्यांवर अत्यंत प्रभावी उपाय ठरते.

जीवामृत ट्यूब कशी काम करते : ही ट्यूब सेंद्रिय शेतीसाठी आवश्यक अशा जीवनसत्त्वांनी आणि सूक्ष्मजीवांनी समृद्ध असलेले जीवामृत तयार करण्याची प्रक्रिया अधिक सोपी करते. फक्त १० ते १२ दिवसांत दर्जेदार जीवामृत तयार होते, जे ड्रीप सिंचन, फवारणी किंवा पाट पाण्यातून सहज वापरता येते.

जीवामृत ट्यूबच्या वापराचे फायदे : कमी वेळेत अधिक प्रमाणात व दर्जेदार जीवामृत तयार होणे. कमी खर्चामुळे रासायनिक खतांवरील अवलंबन कमी होणे. जमिनीचा पोत सुधारून भुसभुशीतता वाढणे. पीक मुळे अधिक बळकट होणे आणि पोषणतत्त्वांचे शोषण सुधारणे. पिकांची प्रतिकारशक्ती वाढून रोग व कीटकांपासून नैसर्गिक संरक्षण मिळते.

जीवामृत ट्यूब वापरल्याने शेतात होतात बदल : पिकांच्या उत्पादनात सरासरी १५ ते २० टक्क्यांनी वाढ. रासायनिक खतांवरील खर्च ४० ते ६० टक्क्यांनी कमी होतो. मातीची सुपीकता आणि पाणी धारण करण्याची क्षमता वाढते. पिकांचा दर्जा सुधारतो आणि फळांचा आकार, चव आणि रंग अधिक आकर्षक होतो. रासायनिक फवारणींची गरज कमी झाल्याने पर्यावरणीय तणावही कमी झाला आहे.

ट्यूबची वैशिष्ट्ये : विविध आकार व मॉडेल्स उपलब्ध. ९०० प्लास्टिक पासून तयार केली जाते. ऊन, पाऊस, वारा आणि बुरशी यांचा कोणताही परिणाम होत नाही. डास, माश्या किंवा दुर्गंधीचा त्रास होत नाही. १०० टक्के वॉटरप्रूफ आणि तीन वर्षांची वॉरंटी सुविधा. बाजारात जीवामृत बनवणाऱ्या खूप साऱ्या कंपन्या उपलब्ध आहेत परंतु, सर्टिफाईड असणारी उष्णतेपासून बॅक्टरियाचा बचाव करणारी वारंवार ब्लॉकेज न होणारी ही एकमेव जीवामृत ट्यूब आहे.

सेंद्रिय शेतीसाठी योग्य पर्याय : जीवामृत ट्यूब केवळ एक साधन नसून शेतकऱ्यांसाठी शाश्वत शेतीकडे नेणारा विश्वासाचा दुवा आहे. या ट्यूबच्या मदतीने शेतकरी कमी खर्चात आणि कमी मेहनतीत अधिक उत्पादन घेऊन नफा वाढवू शकतात. तसेच, रासायनिक खतांवरील अवलंबन कमी करून पर्यावरणासही अनुकूल योगदान देऊ शकतात.

# टोमॅटो लागवड पध्दत

टोमॅटो पिकास स्वच्छ, कोरडे, कमी आर्द्रता असलेले व उष्ण हवामान चांगले मानवते. साधारणतः १८ ते ३० अंश सेल्सिअस तापमानात हे पीक चांगले येते. तापमान ३८ अंश सेल्सिअसवर गेल्यास पिकाची शारीरिक क्रिया मंदावते व पेशींना इजा होते. तसेच तापमान जर १० अंश सेल्सिअसखाली गेले, तरी पिकाच्या वाढीवर प्रतिकूल परिणाम होतो.

पिकास इजा होऊन उत्पादनात मोठी घट येते. जास्त तापमान, कमी आर्द्रता आणि कोरडे वारे असतील, तर टोमॅटो पिकाची फुलगळ होते. उष्ण तापमान व भरपूर सूर्यप्रकाश असणाऱ्या हवामानात टोमॅटो फळांची गुणवत्ता ही चांगली असते, तर रंगदेखील आकर्षक येतो. चांगला निचरा असलेल्या मध्यम काळ्या जमिनीत किंवा पोयट्याच्या जमिनीत हे पीक चांगले येते. हलक्या जमिनीत पीक लवकर निघते, तर भारी जमिनीत फळांचा तोडा उशिरा सुरू होतो; परंतु उत्पादन भरपूर निघते. उन्हाळी टोमॅटो पीक हलक्या व उथळ जमिनीत घेऊ नये. जमिनीचा सामू ६ ते ७.५ दरम्यान असावा.

# राजमा (घेवडा) लागवड पद्धत

उत्तर भारतामध्ये घेवडयाला राजमा म्हणतात. शेंगवर्गीय भाजीपाला पिकापैकी घेवडा हे कमी दिवसात अधिक उत्पन्न देणारे पिक आहे. महाराष्ट्रात पुणे, सातारा, अहमदनगर, सोलापूर, नाशिक इत्यादी जिल्हयांमध्ये श्रावण घेवडयाची लागवड मोठया प्रमाणात केली जाते. महाराष्ट्रामध्ये अंदाजे ३१०५० हेक्टर क्षेत्रावर श्रावणी घेवडयाची लागवड होते. घेवडयाच्या कोवळया शेंगाची भाजी तसेच सुकलेल्या दाण्यांची उसळ लोकप्रिय आहे. घेवडयांच्या पानाचा उपयोग जनावरांच्या चा-यासाठी करता येतो. शेंगामध्ये अ आणि ब जीवनसत्व तसेच खनिजे, लोह आणि चुना तसेच प्रथिने भरपूर प्रमाणात असतात.

जमिन व हवामान : घेवडा हेक्टरी पिक हलक्या ते मध्यम जमिनीत पाण्याचा निचरा असणा-या जमिनीत उत्तम प्रकारे येते. अतिभारी जमिनीत झाडांची वाढ भरपूर होते. परंतु शेंगा कमी लागतात. जमिनीचा सामु ५.५ ते ६ च्या दरम्यान असावा. घेवडा हेक्टरी थंड हवामानात आणि पावसाळयात येणारे पिक असून १५ ते ४० अंश सेल्सिअस तापमानात हेक्टरी पिक चांगले येते. अतिथंडी व अतिउष्ण हवामान या पिकास मानवत नाही.

पूर्व मशागत : जमिनीची उभी आडवी नांगरट करून, कुळवाच्या पाळया देऊन ढेकळे फोडून जमिन भूसभुशीत करावी. जमिनीत ४० ते ४५ बैलगाडया हेक्टरी या प्रमाणात शेणखत मिसळावे.

लागवड हंगाम : महाराष्ट्रात या पिकाची लागवड तीनही हंगामात होते. खरीप हंगामासाठी जून, जूलै महिन्यात रब्बी हंगामासाठी सप्टेंबर ऑक्टोबर महिन्यात आणि उन्हाळी हंगामात जानेवारी, फेब्रूवारी महिन्यात घेवडयाची लागवड करतात.

वाण : घेवडयाच्या कटेंडर, पुसा पार्वती, अर्का कोमल, व्ही.एल., ५ जंपा, पंत अनुपमा, फूले सुयश या प्रकारच्या जाती लागवडीयोग्य आहेत.

पूर्वमशागत : जमीनीची उभी आडवी नांगरट करून, कुळवाच्या पाळया देऊन ढेकळे फोडून जमीन भुसभुशीत करावी. जमिनीत ४० ते ४५ बैलगाडया हेक्टरी या प्रमाणात शेणखत मिसळावे.

लागवड : खरीप हंगामात पिकाची पेरणी पाभरीने अथवा तिफणीने पहिला पाऊस पडून गेल्यावर, जमिन वाफश्यावर आल्यावर करावी. पेरणी करताना दोन ओळीतील अंतर ४५ सेमी आणि दोन झाडातील अंतर ३० सेमी ठेवावे. यानंतर विरळणी करून दोन झाडात ३० सेमी अंतर ठेवावे.बिया टोकन पध्दतीने २ ते ३ सेमी खोलीवर पेराव्यात. उन्हाळी हंगामात बियांची पेरणी ६० ते ७० सेमी अंतरावर सरी वरंब्यावर करावी. वरंब्याच्या दोन्ही बाजूला बगलेत ३० सेंटीमीटर अंतरावर २ ते ३ बिया टोकाव्यात.



खते व पाणी व्यवस्थापन : सर्वसाधारणपणे हेक्टरी ७२० किलो बियाण्याचे आणि ६३० किलो पाल्याचे उत्पादन देणाऱ्या घेवडयाचे पीक जमिनीतून ६६ किलो नत्र २७ किलो स्फूरद आणि ५५ किलो पालाश शोषून घेते. यावरून घेवडयाच्या पिकाला जमिनीतून लागणा-या मुख्य अन्नघटकाची आवश्यकता लक्षात येते. निरनिराळया प्रयोगावरून घेवडयाच्या पिकाला शेणखत आणि रासायनिक खतांच्या पुढील मात्रांची शिफारस करण्यात आली आहे. घेवडयाच्या पिकाला ४० टन शेणखत, ५० ते ५४ किलो नत्र ५० ते १०० किलो स्फुरद आणि ५० ते ११० किलो पालाश प्रति हेक्टरी द्यावे. स्फूद आणि पालाश पूर्ण आणि अर्धा नत्र पेरणीच्या वेळी द्यावा आणि उरलेला अर्धा नत्र बी उगवल्यानंतर तीन ते चार आठवडयांनी द्यावा. घेवडयाच्या पिकाची मुळे जमिनीत उथळ वाढत असल्यामुळे पिकाला जास्त पाणी दिल्यास ते मुळांना अपायकारक ठरते. मात्र फूलो-याच्या वेळी जमिनीत पुरेसा ओलावा नसल्यास फळधारणा कमी प्रमाणात होते. म्हणून घेवडयाच्या पिकाला फूले येण्याआधी पाणी द्यावे. तसेच पावसाळयात जमिनितील पाण्याचा निचरा होणे आवश्यक असते. खरीप हंगामातील घेवडयाच्या पिकाला पाणी देण्यात आवश्यकता भासत नाही. परंतू पाऊस नसल्यास पिकाला गरजेनुसार पाणी द्यावे. उन्हाळी हंगामातील पिकाला ८ ते १० दिवसांच्या अंतराने आणि जमिनीच्या मगदुरानुसार पाण्याच्या पाळया द्याव्यात.

आंतरमशागत : खरीप हंगामात पिकाची पेरणी केल्यानंतर १५ दिवसांनी विरळणी करावी. खरीप हंगामात तणांचा योग्य वेळी बंदोबस्त करणे आवश्यक आहे. १ ते २ खुरपण्या देऊन तण काढावे किंवा पेरणीपूर्वी तणनाशकाची फवारणी करावी. खरीप हंगामात जास्त प्रमाणात पाऊस झाल्यास आणि योग्य प्रमाणात पाण्याचा निचरा न झाल्यास चर खोदून पाणी शेताबाहेर काढून द्यावे.

मावा : मावा कीड घेवडयाच्या पानातील रस शोषून घेते. त्यामुळे पानाच्या कडा वळतात. मावा किड वाढणा-या फांद्या आणि लहान पानांतील रस शोषून घेते. या किडीच्या प्रादुर्भावामुळे काहीवेळा फूलांची गळ होते. मावा किडीच्या नियंत्रणासाठी १० लिटर पाण्यात सायपरमेथीन (२५ टक्के प्रवाही) ५ मिली किंवा १० मिलीलीटर रोगोर (३० टक्के प्रवाही ) या प्रमाणात पाण्यात मिसळून फवारावे.

शेंगा पोखरणारी अळी : ही किड प्रथम शेंगाच्या पृष्टभागावर आढळून येते. ही किड नंतर शेंगेच्या आत शिरून आतील दाणे खाऊन फस्त करते. या किडीचा उपद्रव दिसून येताच ५ टक्के कार्बरिल दर हेक्टरी २० किलो या प्रमाणात धुराळावे

खोडमाशी : लागवडीनंतर १५ ते २० दिवसांत या किडीचा मोठया प्रमाणावर उपद्रव होतो. या किडीचे मादी फूलपाखरू पीक पहिल्या दोन पानांवर असतांना पानांवर अंडी घालते. अंडी उबवल्यानंतर अंडयामधून अळया बाहेर पडतात. अळी खोडावर जाते आणि खोडाच्या आतील भाग पोखरून खाते. या किडीचे सुप्तावस्थेत कोश जमिनीलगत खोडामधून पडतात. खोडमाशीच्या अळीच्या नियंत्रणासाठी १० लिटर पाण्यात ५ मिलीलिटर सायपरमेथीन (२५ टक्के प्रवाही) हे कीटरनाशक मिसळून फवारणी करावी.

भूरी : हा रोग बुरशीमुळे होतो. या रोगाची पिकाला लागण झाल्यास पानावर, काडयावर आणि शेंगावर पांढरी पावडर असलेले ठिपके दिसतात. घेवडयावरील भूरी रोगाच्या नियंत्रणासाठी ३०० मेश गंधकाची भुकटी दर हेक्टरी ३० किलो प्रमाणात धुराळावी.

तांबेरा : तांबेरा हा बुरशीजन्य रोग असून त्यात पानाच्या खालच्या भागावर तांबूस काळपट रंगाचे फोड येतात. तांबेरा रोगाच्या नियंत्रणासाठी १० लिटर पाण्यात २० ग्रॅम डायथेन एम-४५ हेक्टरी बुरशीनाशक मिसळून तांबेरा रोगाची लागण दिसून येताच फवारणी करावी.

मर : मर (विल्ट) हा बुरशीजन्य रोग असून या रोगाची पिकाला लागण झाल्यास झाडांची पाने पिवळी पडून ती गळतात. मर रोगाच्या नियंत्रणासाठी बियाण्यास पेरणीपूर्वी बुरशीनाशक औषध चोळावे किंवा घेवडयाच्या रोगप्रतिबंधक जाती लावाव्यात.

# भर पावसात अंगणवाडी सेविका व मदतनिसांचा संताप

## बीड जिल्हा परिषदेसमोर तीव्र आंदोलन, प्रशासनालाही फोडला घाम!





बीड । प्रतिनिधी

अंगणवाडी सेविकांच्या प्रलंबित मागण्यांसाठी गुरुवारी (दि.२४ जुलै) बीड जिल्हा परिषदेसमोर महाराष्ट्र राज्य अंगणवाडी सेविका व मदतनीस महासंघाच्या वतीने तीव्र निदर्शने व धरणे आंदोलन करण्यात आले. भर पावसातही मोठ्या संख्येने उपस्थित राहून सेविकांनी प्रशासनाच्या मनमानी विरोधात आवाज उठवला. शेवटी जिल्हा कार्यक्रम अधिकारी यांनी स्वतः आंदोलनस्थळी येऊन सेविकांचे निवेदन स्विकारले.

एफ.आर.एस. प्रणालीद्वारे टी.एच.आर. वितरण करताना भेडसावत असलेल्या तांत्रिक अडचणी, मोबाईल हँग होणे, ओटीपी न येणे, नेटवर्क नसणे यामुळे कामाचा ताण वाढला असून यावर कोणताही तोडगा प्रशासनाकडून निघालेला नाही, असा आरोप सेविकांनी केला. त्याचबरोबर, पेन्शन, ग्रॅच्युईटी आणि ऑक्टोबर २४ ते जून २५ चा प्रोत्साहन भत्ता तात्काळ वितरित करावा, प्रोत्साहन भत्ता नियमित मानधनात समाविष्ट करून सेविकांना १५,००० व मदतनिसांना ८,५०० रुपये दरमहा मानधन देण्यात यावे,अंगणवाडीचे वेळापत्रक सकाळी ९.३० ते दुपारी २.३० पर्यंतच लागू ठेवावे, सक्तीची ४ वाजेपर्यंतची अट हटवावी, अशा अनेक महत्त्वाच्या मागण्यांसह आंदोलन करण्यात आले.

भगवान देशमुख, कमल बांगर, दत्ता देशमुख, सचिन आंधळे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात बीड जिल्ह्यातील विविध भागांतील अंगणवाडी सेविका व मदतनीस या आंदोलनात सहभागी झाल्या. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे सेविकांमध्ये प्रचंड नाराजी असून, मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. भर पावसातही आंदोलक महिलांचा उत्साह आणि संघर्ष प्रशासनाला घाम फोडणारा होता. स्वात: जिल्हा कार्यक्रम अधिकारी ससे यांनी निवेदन स्विकारले.

## लिंबागणेश येथे राज्यव्यापी चक्काजाम आंदोलनाला प्रतिसाद



लिंबागणेश । प्रतिनिधी

माजी राज्यमंत्री तथा प्रहार जनशक्ती पक्ष चे संस्थापक अध्यक्ष श्री. ओमप्रकाश (बच्चू) कडु यांनी मांडलेल्या शेतकरी कर्जमाफी, शेतीमालाला हमीभावावर २० टक्के प्रोत्साहन बोनस, कामगार, दिव्यांग व विधवा महिलांना मासिक ६००० रुपये मानधन, तसेच रोजगार, शिक्षण व आरोग्य या मूलभूत मुद्द्यांवर तातडीने निर्णय घ्यावेत या मागण्यांसाठी पुकारलेल्या राज्यव्यापी ''चक्का जाम'' आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी लिंबागणेश येथेही आंदोलन करण्यात आले. आज गुरुवार, दि.२४ रोजी सकाळी अहमदपूरअहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावरील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन सुरू झाले. यावेळी सरकारविरोधात घोषणाबाजी करण्यात आली.

या आंदोलनात सेवा सोसायटीचे चेअरमन रविंद्र निर्मळ, शिवशक्ती भिमशक्ती विचारमंच प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील यांची समायोजित भाषणे झाली. यावेळी नेकनूर पोलिस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे यांच्या मार्फत मागण्यांचे निवेदन मुख्यमंत्री , उपमुख्यमंत्री, बच्च्चूभाऊ कडु यांना देण्यात आले. लिंबागणेश पोलिस चौकीचे सहाय्यक फौजदार बाबासाहेब राख, पो.शि. बाबासाहेब खाडे, विशाल कदम, पो.हे. अनिल राऊत हे देखील उपस्थित होते. आंदोलनात सरपंच बालासाहेब जाधव, राजेभाऊ आप्पा गिरे, बाळकृष्ण थोरात, विक्रांत वाणी, सुरेश निर्मळ, संजय घोलप, अभिजित गायकवाड, सय्यद अख्तर, दादा गायकवाड, अंकुश वाणी, भगवान मोरे, भालचंद्र गिरे, तुळशीराम वनवे, गणपत घोलप, प्रकाश ढवळे, धनंजय बागल, दादाराव घाडगे, विशाल वाणी , प्रकाश निर्मळ,संदिप निर्मळ,अजय थोरात आदींचा उत्स्फूर्त सहभाग होता.

## आपल्या जीवनात गुरुविषयी निष्ठा, संयम व श्रद्धा ठेवा-आभाश्रीजी

बीड । प्रतिनिधी

येथील जैन भवन विजय टॉकीज येथे चातुर्मास उत्सवात प्रवचन सेवेचा विषय होता गुरु शिष्य. आपल्या जीवनामध्ये गुरूचे स्थान हे अत्यंत महत्वाचे आहे. आपल्या मनात गुरु विषयी आत्म सन्मान आणि विश्वास हा दृढ असावा. गुरु आणि शिष्य यांचे नाते हे सर्व नात्यापेक्षा अगदी जवळचे आणि जीवाभावाचे श्रेष्ठ नाते असते. आपल्या शिष्याचे भले कशात आहे याचाच विचार आपले गुरु करत असतात आणि आपल्या गुरु विषयी आपल्या जीवनामध्ये त्यांचा मानसन्मान जवळीकता व गुरु विषयी प्रेम असणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन पं. पुज्य महासती आभाश्रीजी मा. सा. प पू डॉ.श्रेयाशीश्रीजी म.सा. यांनी केले.

जीवनामध्ये गुरुचे मन जिंका त्यामुळे आपल्या जीवनातील दुःख दूर करून आपल्या जीवनात सुकाळ निर्माण करण्याचे काम फक्त आणि फक्त गुरुच करतात हा दृष्टांत सांगताना एकलव्य व गुरु द्रोणाचार्य यांचा प्रसंग सांगितला.

गुरुदक्षिणेच्या मोबदल्यात एकलव्याने आपल्या हाताचा उजवा अंगठा दिला. खर तर ही गुरूंनी एकलव्याची घेतलेली परीक्षा होती, परंतु त्या परीक्षेत देखील एकलव्य उत्तीर्ण झाला. आपला अंगठा गुरुदक्षिण म्हणून देण्यामध्ये एकलव्याचे गुरुप्रती असणारे समर्पण, गुरु प्रति असणारा आदर आणि आपण ज्या गुरूमुळे धनुर्विद्या प्राप्त केली याचे मोठेपन होते. या सर्वांतून उतराई व्हावी म्हणून एकलव्यांनी उरला गुरुदक्षिणा म्हणून आपल्या उजव्या हाताचा अंगठा दिला हा प्रसंग ऐकताना सभा मंडपातील सर्वस्रोते अगदी मंत्रमुग्ध झाले होते.

## शेतकऱ्यांचा कर्ज माफ करा नसता खुर्ची रिकामी करा

जालना । प्रतिनिधी

माजी आमदार बच्चू कडू यांच्या सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा म्हणून अंबड तालुक्यातील सुखापुरी फाटा येथे चक्काजाम आंदोलन करण्यात आले.



यावेळी गाडी बैलासह शेतकऱ्यांनी व महिला भगिनी विद्यार्थी वर्ग यांच्यावतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी शेतकऱ्यांनी राज्य सरकारच्या विरोधात जोरदार घोषणा दिल्या. शेतकऱ्यांची कर्जमाफी करा नसता खुर्च्या रिकाम्या करा, अशा घोषणा देण्यात आल्या होत्या. यावेळी तहसील कार्यालयात निवेदन देण्यात आले. राज्यातील शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करणे, स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी लागू करणे, निराधार विधवा महिलांच्या अनुदानात वाढ करणे, ज्या ठिकाणी समाज कल्याण अधिकारी मनमानी करीत असतील त्यांच्यावर कारवाई करावी, जालना जिल्ह्यातील २०२३ – २४ मध्ये झालेल्या अतिवृष्टी अनुदानातील ५०००० च्या वरती राहिलेले अनुदान अद्यापही जमा झाले नाही ते जमा करण्यात यावे, वरील सर्व मागण्या मान्य न केल्यास मंत्र्यांना रस्त्यावर फिरू देणार नाही, असा गंभीर इशारा यावेळी देण्यात आला. या आंदोलनामध्ये प्रकाश बोरडे, दिलीपराव हातोटे, अशोक पालकर, मा सरपच शिवाजी खराबे, मा. सरपच राम नाना काळे, मा. सरपच सुदाम राठोड, मा. सरपच ज्ञानेश्वर तारगे, चेअरमन नारायण कनके, अबादास गोरे, सुनील मुसळे, गोवर्धन राजगुरू, दत्तात्रय कसाब, प्रल्हाद जगले, महिला व तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.सर्व शेतकरी अपग, निराधार यांनी सुमारे दोन तास चक्काजाम आदोलन केले. यावेळी वाहनाच्या तीन ते चार किलोमीटर लांबच लांब रांगा लागल्या होत्या. या दरम्यान एक रुग्णालय वाहनाला ताबडतोब रस्ता मोकळा करून देण्यात आला.

## सोमवारी परशुराम महाराज मराडे यांची प्रवचन सेवा

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील बार्शी रोड वरील स्वराज्य नगर येथील रहिवाशी व बीड जिल्ह्यातील सुप्रसिद्ध कीर्तनकार, ज्ञानेश्वरीचे गाढे अभ्यासक ह.भ.प. माधव महाराज डाके यांच्या माऊली निवास्थानी प्रतीवर्षा प्रमाणे यावर्षी ही चातुर्मास उत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, आषाढी एकादशी ते कार्तिक एकादशी या चार महिन्यांच्या पवित्र पर्वकाळात प्रती सोमवारी रात्री ८ ते ९ यावेळेत विविध ज्ञानेश्वरी ग्रंथ प्रेमी महाराज मंडळींची श्री ज्ञानेश्वरी प्रवचन सेवा संपन्न होत आहे.

या चातुर्मास उत्सवा निम्मित सोमवार दिनांक २८/७/२५ रोजी रात्री ८ते९ या वेळेत ह भ प प्राचार्य परशुराम महाराज मराडे सर (ज्ञानेश्वरी व तुकाराम गाथा ग्रंथाचे गाडे अभ्यासक) तथा मठाधिपती तुकोबाराय सेवा पीठ तळेगाव यांची प्रवचन सेवा होणार आहे. सदरील प्रवचन सेवेचे थेट प्रक्षेपण माधव महाराज डाके काठवडेकर या फेसबुक अकाऊंट वरून होणारअसून,या चातुर्मास उत्सवात आपण सर्वांनी सहभागी होऊन श्री ज्ञानेश्वरी प्रवचन श्रवणनाच लाभ घ्यावा असे आवाहन ह भ प माधव महाराज डाके यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## उज्ञैनपुरीत नेत्र तपासणी मोतीबिंदु शस्त्रक्रिया शिबिर!

जालना । प्रतिनिधी



लायन्स क्लब ऑफ जालना, लॉयन्स आय हॉस्पिटल चिकलठाणा, शिवसेना जालना जिल्हा आणि नाथ फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी ( ता. २५) उज्जैनपुरी ता बदनापूर येथे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदु शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती शिवसेना जिल्हा प्रमुख तथा प्रकल्प प्रमुख लॉ. भाऊसाहेब घुगे यांनी दिली.

सकाळी नऊ वाजता शिबिराचे उद्घाटन होईल. दुपारी ०२.०० पर्यंत चालणाऱ्या या शिबिरात चिकलठाणा येथील लॉयन्स आय हॉस्पिटल मधील तज्ञ नेत्र चिकित्सकांचे पथक येणार असून डोळ्यांच्या विविध आजारांची तपासणी केली जाणार आहे. मोतीबिंदु आजार असलेल्या रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया केल्या जातील. तरी उज्जैनपुरीसह पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी शिबिराचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन भाऊसाहेब घुगे, राधेश्याम टिबडेवाल, सचिव राजेश खिस्ते, कोषाध्यक्ष रतन बजाज, विजय दाड, मीनाक्षी दाड, कल्पना घुगे, यांच्यासह शिवसेना पदाधिकारी आणि उज्जैनपुरी ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

## अखिल भारतीय पंचायतच्या मागणीला यश

### सिव्हिल हॉस्पिटल जालना' येथे सर्व बस थांबे मंजूर!

जालना । प्रतिनिधी

अखिल भारतीय ग्राहक पंचायत, जालना शाखेच्या पाठपुराव्याला यश मिळत जिल्ह्यातील प्रवाशांसाठी एक महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. एस.टी. महामंडळाच्या लांब पल्ल्याच्या बसेसना आता 'सुखापुरी फाटा' व 'सिव्हिल हॉस्पिटल (घाटी) जालना' येथे अधिकृत थांबा मंजूर करण्यात आला आहे. विभाग नियंत्रक (एस.टी.) जालना यांनी हा निर्णय घेत आगार प्रमुखांना याबाबत स्पष्ट सूचना दिल्या आहेत.

सुखापुरी फाटा हे २५-३० खेड्यांच्या दळणवळणासाठी एक महत्त्वाचे ठिकाण आहे. आठवडी बाजार, शैक्षणिक गरजा व वैद्यकीय कारणास्तव मोठ्या प्रमाणावर नागरिक अंबड व जालना येथे प्रवास करतात. या पार्श्वभूमीवर ग्राहक पंचायतच्या पुढाकाराने व सुखापुरी व वसंतनगर ग्रामपंचायतींच्या ठरावांच्या आधारे हा प्रस्ताव पाठवण्यात आला होता.जिल्हा रुग्णालय परिसरात एस.टी. बस थांबवण्यात आल्यास रुग्ण, वृद्ध आणि ग्रामीण भागातून येणाऱ्या प्रवाशांना फार मोठा लाभ होणार आहे. ग्राहक पंचायतच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत यालाही बस थांबा मंजूर करण्यात आला आहे. विभाग नियंत्रकांनी अंबड, जालना, परतूर आणि जाफराबाद येथील आगार व्यवस्थापकांना लेखी आदेश देत या ठिकाणी बसेस थांबवण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच दोन्ही थांबे ई-टीआय/ओआरएस प्रणालीत समाविष्ट केल्यामुळे तिकिट बुकिंगही शक्य होणार आहे. चालक-वाहक यांना या थांब्यांची माहिती देण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना, रुग्णांना व नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

## जामीन मिळताच आरोपीने फिर्यादीला पुन्हा केली मारहाण; फिर्यादीची पोलीस अधीक्षकांकडे धाव!

बीड । प्रतिनिधी

शहरातील गांधीनगर भागात राहणारे मिर्झा लियाकत सज्जन बेग यांना आरोपी बाबा खाजा शेख, आयेशा बाबा शेख, शेख शहेनाज अब्दुल शेख (गिड्डी), शेख हिना यांनी दोन महिन्यांपूर्वी मारहाण केली होती. त्यानंतर लियाकत बेग यांनी या मारहाण प्रकरणी पेठ बीड पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली असता मारहाण करणाऱ्या आरोपींवर दिनांक २४ मे २०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. यामुळे मारहाण करणाऱ्या तिन्ही आरोपींना पोलिसांकडून अटक करण्यात आली होती. नंतर त्यांची जामीनावर मुक्तता झाली. जामीन मिळताच या सर्व आरोपींनी पुन्हा लियाकत बेग यांच्या घरी जाऊन अर्वाच्य शिवीगाळ करत मारहाण केली व पुन्हा एकदा जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या. यामुळे मिर्झा लियाकत बेग यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याकडे धाव घेऊन रीतसर तक्रार देत आरोपींकडून जीवितास धोका असल्याचे म्हटले आहे तसेच सर्व आरोपींना तात्काळ अटक करण्यात यावी अशी मागणी केली आहे.

याविषयी जिल्हा पोलिस अधीक्षकांना दिलेल्या निवेदनात लियाकत बेग यांनी नमूद केले आहे की, आरोपी बाबा खाजा शेख, आयेशा बाबा शेख, शेख शहेनाज अब्दुल गफ्फार, अब्दुल जाफर शेख व शेख हिना सर्व राहणार गांधीनगर. हे सर्वजण आरोपी असून गुंड प्रवृत्तीचे आहेत. यापूर्वीही यांच्या विरोधात विविध पोलीस ठाण्यामध्ये अनेक स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. या सर्वांनी मिळून यापूर्वी लियाकत बेग यांना दोन महिन्यांपूर्वी मारहाण केली होती. तसेच जीवे मारण्याची धमकी सुद्धा दिली होती. या सर्व आरोपीतांकडे तलवार, कुकरी सारखे प्राण विघातक शस्त्र आहेत. आणि हे सर्वजण या शस्त्रां चा धाक दाखवून वेळप्रसंगी त्याचा समोरच्या व्यक्तींवर वापर करून प्राणघातक हल्ले करतात. अशाच पद्धतीने त्यांनी यापूर्वी २४ मे २०२५ रोजी सुद्धा लियाकत बेग यांच्यावर प्राणघातक हल्ला केला होता. त्यानंतर लियाकत बेग यांनी पेठ बीड पोलीस ठाणे येथे तक्रार दिली होती. म्हणून या सर्वांना पोलिसांनी अटक केली होती मात्र या सर्वांची जामीन होऊन सुटका होताच त्यांनी पुन्हा बाहेर येताच लियाकत बेग यांच्या घरी जाऊन शिवीगाळ करत मारहाण केली आणि पुन्हा जिवे मारण्याची धमकी दिली. या सर्वांपासून जीवितास धोका असल्याने लियाकत बेग यांनी थेट जिल्हा पोलीस अधीक्षकांना गाठून या सर्वांना अटक करावी या सर्वांकडून आपल्या जीवतास धोका असल्याचे म्हटले आहे. याप्रकरणी जिल्हा पोलीस अधीक्षक कोणती कारवाई करतात याकडे लक्ष लागले असल्याचे मिर्झा लियाकत बेग यांनी म्हटले आहे.

## अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या मराठवाडा उप विभागीय कार्यालयाचे उद्घाटन

बीड । प्रतिनिधी

मराठवाड्यातील महामंडळाची वाढती व्याप्ती लक्षात घेऊन, अण्णासाहेब पाटील विकास फाउंडेशनच्या विशेष सहकार्यातून कार्यान्वित होणाऱ्या अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या मराठवाडा विभागाच्या ''उपविभागीय कार्यालयाचे उद्धघाटन'' रविवार, २७ जुलै, २०२५ रोजी सकाळी ११ वाजता यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड येथे होत आहे. या कार्यालयाच्या उद्धघाटन समारंभाच्या निमित्ताने बीड येथे मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन महामंडळाचे विभागीय समन्वयक प्रवीण आगवण पाटील यांनी केले.

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या योजनेचा मराठवाड्यात प्रचार, प्रसारासाठी व्याप्ती वाढवणे. मराठवाड्यातील जिल्ह्यातील लाभार्थ्यांची महामंडळाच्या निगडीत कामाकरीता ई-सेवा केंद्र, सेंटर, खासगी ऑनलाईन सेंटर अथवा एजंटकडून होणारी फसवणूक टाळणे. मराठवाड्यातील मराठा समाजापर्यंत पोहोचून त्यांना महामंडळाच्या योजनांचा लाभ मिळवून देऊन जास्तीत जास्त लाभार्थी उद्योजक घडविणे. यासाठी बँकेत प्रलंबित कर्ज प्रकरण संदर्भातील तक्रार निरसन करून व्याज परतावा त्रुटींबाबत मार्गदर्शन करून , विषयी हेल्पलाईन सेंटरच्या माध्यमातून समस्या निवारण करणे असे या उप विभागीय कार्यालयाच्या उद्धघाटना मागील उद्दिष्टे आहेत.मराठवाडा विभागातील हे कार्यालय सुसज्ज आणि अद्ययावत असणार आहे. पात्र लाभार्थ्यांना या ठिकाणी महामंडळाकडून





देण्यात येणाऱ्या सर्व सुविधा येथे उपलब्ध असतील. या उपविभागीय कार्यालयामुळे मराठवाड्यातील लाभार्थी यांचा वेळ वाचेल. अधिकाधिक लाभार्थी यांना महामंडळाच्या योजनांचा लाभ देण्यासही लाभार्थी व महामंडळ यांना सोयीचे होईल. तालुकास्तरावर देखील महामंडळाच्या योजना पोहोचविण्यासाठी आगामी काळात दौरे करण्यात येणार असल्याचे महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी सांगितले. अण्णासाहेव पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या योजनेची व्याप्ती वाढवण्यासाठी उप विभागीय कार्यालय राजू कॉम्प्लेक्स,२रा मजला, हिना हॉटेल समोर, जालना रोड, बीड येथे सुरु करण्यात येत आहे. या निमित्त यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या महामंडळाच्या ''उप विभागीय कार्यालय उद्घाटन समारंभास'' जनतेने मोठ्या संख्येने उपस्थित रहावे व मेळाव्यात सहभागी होऊन महामंडळाच्या योजनेची माहिती घ्यावी. याबरोबरच लाभार्थ्यांनी स्वतःची समस्या निवारण करून घ्यावे, असे आवाहन श्री. आगवण पाटील यांनी केले.

## महानगरपालिकेने दिव्यांगाचे प्रश्न तात्काळ मार्गी लावावेत



जालना । प्रतिनिधी

जालना शहरातील दिव्यांगच्या मागण्या तात्काळ मार्गी लावाव्यात यासाठी जालना महानगरपालिकाचे उप आयुक्त यांना निवेदन देण्यात आले. यावेळी शिवसेना दिव्यांग आघाडी जिल्हा अध्यक्ष. अनिल मगदूले, राहुल मुळे, शंकर शिरगुले, जगदीश सातपुते, शेख इस्माईल., प्रकाश एडके, सुरेश बोरुडे, अंकुश वाघचूरे, रवि तायडे, शे. रशीद. व शहरातील सर्व दिव्यांग उपस्थित होते. यावेळी लवकरच दिव्यांग व्यक्तीचे प्रश्न मार्गी लागतील., असे आश्वासन. महापालिकेच्या उप आयुक्त गायकवाड मॅडम यांनी शहरातील दिव्यांगांना दिले.

# दिव्यांगासाठी वडवणी येथील शिबिरात ३५० जणांची तपासणी

## दिव्यांगांना मिळणार उत्तम दर्जाचे साहित्य-गटविकास अधिकारी नागरगोजे

**वडवणी । प्रतिनिधी**

**येथे दिनांक २४ जुलै २०२५ रोजी जिल्हा समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद बीड व , मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत कृत्रिम सहाय्य साधने वाटपाच्या अनुषंगाने वडवणी तालुक्यात पूर्व तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.**

या शिबिराचे उद्घाटन नागरगोजे (गटविकास अधिकारी वडवणी)यांच्या हस्ते संपन्न झाले.दिव्यांग शाळेचे मुख्याध्यापक अशोक चव्हाण, फुलचंद लुचारे, सुनील भोंडवे व कर्मचारी यांची उपस्थिती होती. केंद्र शासनाच्या माध्यमातून दिव्यांग लोकांना आवश्यक तो



लाभमिळावा, यासाठी मी प्रामाणिक प्रयत्न करत आहे. सर्व दिव्यांगाना अतिशय उत्तम दर्जाचे साहित्य उपलब्ध करून देऊ, असे गटविकास अधिकारी यांनी सांगितले. या शिबिरामध्ये विविध प्रकारच्या दिव्यांग व ज्येष्ठ लाभार्थ्यांची सखोल तपासणी करण्यात आली. प्रत्येक लाभार्थ्याची वैद्यकीय तपासणी करून त्यांना आवश्यक कृत्रिम सहाय्य साधनांची निवड व नोंदणी करण्यात आली.या शिबीरामध्ये दिव्यांगांना जयपुरी फुट, कृत्रिम हात, कॅलीपर, व्हिलचेअर, ट्रायसिकल, क्रचेस, वॉकींग स्टीक, ब्रेल किट, स्मार्ट फोन, श्रवणयंत्र या सह जेष्ठ नागरीका करीता बेल्ट, वॉकर, काठया, चष्मे, कृत्रिम दात, खुबड, कृत्रिम अवयव, कानाची मशिन, व्हिलचेअर कमोडसहीत, सिलीकॉन खोम तकीया, नीब्रेस, स्पायनल सपोर्ट, सरवायकल कॉलर या सह इतर साहित्य वाटप करण्यात येणार आहे. या उपक्रमामार्फत वडवणी तालुक्यातील गरजू दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून, भविष्यात अधिकाधिक लाभार्थ्यांपर्यंत सेवा पोहोचवण्याचा मानस आयोजक संस्थांनी व्यक्त केला.या सर्व कार्यक्रमासाठी पंचायत समितीचे श्री. हजारे साहेब यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

**शिबिरात केली ३५० लाभार्थ्यांची तपासणी**

अस्थिव्यंग लाभार्थी- १३८, मुकबधिर/ कर्णबधिर लाभार्थी३३, मतिमंद लाभार्थी ३८, दृष्टिहीन / अंध लाभार्थी ४१, ज्येष्ठ नागरिक लाभार्थी ९९

# बडतर्फ पोलीस उपनिरीक्षक रणजीत कासले यांचा जामीन फेटाळला

बीड । प्रतिनिधी



व्हिडिओ प्रसारित करून जातीय तेढ निर्माण करणाऱ्या बडतर्फ पोलीस उपनिरीक्षक रणजीत कासले याला न्यायालयाने जामीन नामंजूर केला.

दिनांक १७/६ /२०२५ रोजी बहुचर्चित पोलीस उपनिरीक्षक रणजीत कासले यांचा अर्ज मा.दुसरे सत्र न्यायालय बीड येथे दाखल केला होता.फिर्यादी मोहन बाबासाहेब आघाव यांनी दिनांक ३०/५/२०२५ रोजी सायबर पोलीस स्टेशन बीड येथे गुन्हा नंबर २३/ २०२५ रणजीत कासले यांच्या विरोधात बी एन एस १९६ व ६७, ८४(क) सी माहिती तंत्रज्ञान अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल केला होता. सोशल मीडियावर ऑनलाईन व्हिडिओ प्रसारित करून दोन जातीत तेढ निर्माण करण्याचे काम केले असून बीड जिल्ह्यातील विद्यमान आमदार व माजी मंत्री धनंजय मुंडे विषयी यांना अर्वाच्छे भाषेत शिवीगाळ अश्लील टिप्पणी केली होती. यामुळे जिल्ह्यात जातीय तेढ , हिंसा ,सामाजिक परिस्थिती अस्थिर होण्याची परिस्थिती निर्माण झाली होती. फिर्यादी कडून योग्य मुद्देसूद तसेच कायदेशीर बाजू ॲडवोकेट किशोर. बी .खेडकर यांनी मांडल्यामुळे बहुचर्चित बडतर्फ पोलीस उपनिरीक्षक रणजीत कासले यांचा जामीन आज दिनांक २४/७/ २०२५ रोजी दुसरे सत्र न्यायालय बीड यांनी फेटाळून लावला.यासाठी विशेष सहकार्य ॲड. अनिल बारगजे , ॲड. बी.एन.झिने, ॲड. विलास ढाकणे एड. विघ्ने, ॲड. एस.ए.चव्हाण यांचे सहकार्य लाभले.

# शेतकरी कर्जमाफीसाठी मेंढपाळासहीत माजलगाव प्रहारचे चक्काजाम आंदोलन

माजलगाव । प्रतिनिधी

शेतकरी कर्जमाफीच्या प्रमुख मागणीसाठी दि २४ जुलै गुरुवार रोजी प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष बच्चु कडू याच्या नेतृत्वाखाली सर्वपक्षीय कार्यकर्ते संपूर्ण महाराष्ट्र मध्ये चक्काजाम आंदोलन करण्यात आले.याचाच भाग म्हणून माजलगाव तालुक्यातील वसंतराव नाईक चौक परभणी फाटा येथे साकळी ११:३० वाजता चक्काजाम आंदोलनास सुरवात करण्यात आली हे आंदोलन तब्बल दोन तास चालू होते या आंदोलनात



शेतकरी तसेच दिव्याग बाधव, मेंढ्यासहित मेंढपाळ मालक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गेल्या काही महिन्यापासून प्रहार चे संस्थापक अध्यक्ष बच्चु कडू यांनी शेतकरी सातबारा कोरा करण्यासाठी कर्जमाफीची मागणी शासनाकडे केली आहे त्यासाठी त्यांनी आमरण उपोषणही केले नंतर पदयात्रा काढली आता कर्जमाफी बाबत प्रत्येकाने आवाज उठवणे गरजेचे असल्याने आंदोलनाच्या पुढील टप्पा म्हणून दि २४ जुलै गुरुवार रोजी राज्यभर चक्काजाम आंदोलन करण्यात आले.या आंदोलनात कोणत्याही पक्षाचा झेंडा नाही केवळ शेतकरी,दिव्यांग, मेढपाळ,मछीमार याच्या विविध प्रश्नासाठी एकत्र येऊन शासनाकडे कर्जमाफीची मागणी पान ३ वर

# ग्राहक सेवा केंद्रातील कर्मचाऱ्याने हडपली सहा लाखांची रक्कम; गुन्हा दाखल

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शहरातील एका नामांकित ग्राहक सेवा केंद्रातून कामावर असलेल्या कर्मचाऱ्याने मालकाचा विश्वासघात करत तब्बल ६ लाख ८ हजार ६०० रुपयांचा आर्थिक अपहार केल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात त्या कर्मचाऱ्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शरद आश्रुबा चव्हाण (रा. मोरेवाडी, ता. अंबाजोगाई) यांचे यशराज ई-सर्व्हिसेस नावाचे ग्राहक सेवा केंद्र नगर परिषद इमारतीत कार्यरत आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, बँकिंग सेवा पुरवणाऱ्या या केंद्रात बँक व्यवहारांचे कामकाज पाहण्यासाठी किरण काशीनाथ जोगदंड याला गेल्या चार वर्षांपासून नोकरीवर ठेवले होते. चव्हाण हे निवडणुकीच्या कामासाठी वारंवार बाहेरगावी जात असल्याने आर्थिक व्यवहाराचा संपूर्ण अधिकार किरणकडे सोपवण्यात आला होता.मार्च २०२५ मध्ये खात्याच्या तपासणीदरम्यान त्यामध्ये मोठी आर्थिक तफावत असल्याचे शरद चव्हाण यांच्या लक्षात आले. त्यांनतर त्यांनी ग्राहक सेवा केंद्रामार्फत झालेल्या सर्व व्यवहारांची चौकशी सुरू केली. सीसीटीव्ही फुटेज व बँक स्टेटमेंट तपासल्यानंतर हे उघड झाले की, जवळपास मागील तीन वर्षांच्या कालावधीत किरण जोगदंड याने मित्र शुभम जोगदंड, बहीण पूजा जोगदंड, पत्नी वैष्णवी जोगदंड आणि मित्र सुनिल पाटोळे यांच्या खात्यांवर विविध तारखांना रक्कम जमा करून ती परत स्वतःकडे घेतली होती. बँक ऑफ इंडियाच्या शाखेतील व एयरटेल पेमेंट बँकेच्या खात्यांमधून किरण जोगदंड याने तब्बल साडेसहा लाख रुपयांचा अपहार केला असून, संबंधित रक्कम फसवणुकीने हस्तांतरित करण्यात आल्याचे निष्पन्न झाले. इतकेच नव्हे तर इतर खात्यांवरही पैसे पाठवले असल्याची शक्यता आहे.

किरण याने हेतुपुरस्सर पान ३ वर

# सुरेश पवार यांची शिक्षण विस्तार अधिकारीपदी पदोन्नती

आष्टी । प्रतिनिधी



येथील केंद्रीय प्राथमिक शाळा आष्टी नं. एकचे केंद्रीय मुख्याध्यापक तथा विवेकानंद शिक्षक पत संस्थेचे माजी चेअरमन सुरेश रामचंद्र पवार यांची सेवा जेष्ठतेनुसार शिक्षणाधिकारी शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून पदोन्नती करण्यात आली बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी त्यांना ही पदोन्नती दिली असून सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्यकार्यकारी अधिकारी प्रदीप काकडे यांनी त्यांच्या पदोन्नतीचे आदेश काढले सुरेश पवार यांची शिक्षण विस्तार अधिकारी पदी पदोन्नती मिळाल्याबद्दल माजी मंत्री तथा विद्यमान आ. सुरेश धस, सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे, आष्टीचे माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे, प्राचार्य सोपान निंभोरे यांच्यासह अनेकांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

# आष्टीत कारगिल विजय दिवस साजरा होणार -खोटे

**आष्टी । प्रतिनिधी**

१९९९ साली भारत पाकिस्तान मध्ये झालेल्या युद्धामध्ये भारताने पाकिस्तानला मोठा धडा वा शिकवत कारगिल युद्ध भारतीय सैन्य दलाच्या उस्फुर्त कामगिरीने जिंकले अशा भारत देशाच्या इतिहासातील गौरव दिन म्हणून उल्लेख केला जातो अशा २६ जुलै १९९९ ला मिळवलेल्या विजयाचा सर्व भारत देशामध्ये २६ जुलै रोजी कारगिल विजय दिन म्हणून साजरा करण्यात येतो. आष्टी शहरांमध्ये छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये २६ जुलै रोजी त्रिदल संघटनेच्या वतीने कारगिल विजय दिन साजरा करण्यात येणार आहे या कार्यक्रमास सेवानिवृत्त मेजर ह भ प विक्रम महाराज जगताप यांचे व्याख्यान होणार आहे तरी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने आष्टी शहरातील देशभक्तांनी उपस्थित राहावे असे आवाहन संघटनेचे अध्यक्ष अंकुश खोटे यांनी केले आहे या कार्यक्रमास मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार लोकनेते सुरेश आण्णा धस शिक्षण महर्षी माजी आमदार भीमराव धोंडे तसेच माजी आमदार साहेबराव दरेकर बाळासाहेब आजबे उप विभागीय अधिकारी वसीमा शेख तहसीलदार वैशाली पाटील डी वाय एस पी बाळकृष्ण हानपुडे तालुका पोलीस निरीक्षक शरद भुतेकर सरपंच परिषद प्रदेशाध्यक्ष दत्ता काकडे जि प सदस्य सतीश शिंदे अंभोरा पोलीस स्टेशनचे पीआय मंगेश साळवे गटविकास अधिकारी गोकुळ बागलाने तसेच तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे तिन्ही तालुक्यातील सभापती उपसभापती नगराध्यक्षप नगराध्यक्ष हे सर्व मान्यवर उपस्थित राहणार आहे तरी या कार्यक्रमास आष्टी शहरातील विविध शाळा कॉलेजचे विद्यार्थी विद्यार्थिनी देखील उपस्थित राहणार आहेत सेवानिवृत्त मेजर विक्रम महाराज जगताप यांचे अनमोल विचार ऐकण्यासाठी आपण देखील मोठ्या संख्येने उपस्थित रहा असे खोटेनी यांनी आव्हान केले आहे

# विद्यार्थीनीना त्रास देणाऱ्या रोडरोमिओचा बंदोबस्त करा-सावंत

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी शहरात तालुक्यातील ग्रामीण भागातून शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थिनी,मुली या शिक्षण घेण्यासाठी येतात तरी शहरातील महाविद्यालय, शाळा, क्लासेस बसस्थानक येथे विद्यार्थिनींना नशेमध्ये असणाऱ्या रोडरोमिओ तरुणाकडून त्रास देण्यात येतो तरी मुलींना त्रास देणाऱ्या अशा रोडरोमियोवर नजर ठेवुन कठोर कारवाई करण्याची मागणी पोलीस निरीक्षक वडवणी यांना काल बुधवार रोजी दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे भाजपचे वडवणी तालुका उपाध्यक्ष महादेवराव सावंत व इतर



पालकांनी केली आहे.

वडवणी हे तालुक्याचे ठिकाण असून या ठिकाणी शिक्षणासाठी तालुक्यातील ग्रामीण भागातील शालेय व महाविद्यालयीन मुली या ये जा करतात तरी शहरातील शाळा,महाविद्यालये ,क्लासेस, बस स्थानक येथे अनेक नशे मध्ये असणारे रोडरोमिओ तरुन हे विद्यार्थीनीची छेडछाड करतात तसेच अश्लिल हावभाव भाषा वापरुन त्रास देतात यामुळे अनेक मुलींनी आपले शिक्षण बंद केलेले आहेत. तरी शहरातील माहाराणी ताराबाई माध्यमिक विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय, बसस्थानक, क्लासेस या ठिकाणी चिडीमार पथकाची स्थापना करुन गस्त घालून अशा त्रास देणाऱ्या रोड रोमियांना ताब्यात घेवून कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी व रोडरोमिओचा बंदोबस्त करण्यात यावा नसता भारतीय जनता पार्टीच्या वतिने पालक विद्यार्थीनीना सोबत घेवून लोकशाही मार्गाने अंदोलन करण्यात येईल.असा इशारा पोलीस उपनिरीक्षक वडवणी यांना दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे भाजपचे वडवणी तालुका उपाध्यक्ष महादेव सावंत,युवा नेते विश्वनाथ मुजमुले, राज आंधळे,भरत माने, तात्या मुजमुले,बबन खळगे, आंप्पासाहेब पान ३ वर

# महानगरपालिकेवर भगवा फडकण्यासाठी तयारीला लागा-आ.अर्जुनराव खोतकर

जालना । प्रतिनिधी

जालना शहर महानगरपालिका निवडणूक संदर्भात २४ जुलै रोजी शिवसेना शहर शाखा व प्रमुख पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक भाग्यनगर संपर्क कार्यालयात आमदार अर्जुनराव खोतकर यांनी घेतली.बैठकीमध्ये प्रभाग निहाय सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून त्यांच्या प्रभागातील शिवसेनेचा आढावा घेण्यात आला त्यांच्या प्रभागात शिवसेनेला महापालिका निवडणूक संदर्भात कसे पोषक वातावरण आहे याची परिस्थिती जाणून घेतली,व कार्यकर्त्यांनी आपण शहरांसाठी



विविध विकास कामासाठी मोठ्या प्रमाणावर शासनाकडुन निधी उपलब्ध करून घेतला यामधून अनेक विकास विकासाची कामे पूर्ण झाली असून अनेक काही कामे प्रगती पथावर आहेत. काही कामे सुरू असून काही कामे निवीदा स्तरावर आहेत. शहरांमधील नवीन विकास कामाचे प्रस्ताव देखील शासन स्तरावर मंजुरीसाठी सादर आहेत.या कामासंदर्भात सर्वसामान्य नागरिकांमध्ये प्रसिद्ध करावी.मतदारामध्ये शिवसेनेबद्दलचा विश्वास निर्माण करून घ्यावा. केलेले विकास कामे सर्व सामान्य जनतेपर्यंत पोहोचण्याचे काम प्रमुख पदाधिकारी व शिवसैनिकांनी करावे. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण या विचारसरणीवर प्रत्येक शिवसैनिकाने तंतोतंत पालन करून आपल्या भागातील जनतेच्या सुख दुःखात नेहमी सहभागी राहावे. आपल्या भागात शिवसेना ,युवासेना ,महिला आघाडी, च्या शाखा स्थापन कराव्यात घर तेथे शिवसैनिक ही संकल्पना आपल्या भागात राबवावी. आगामी महानगरपालिका निवडणूकीत पहिला महापौर शिवसेनेचा

पान ३ वर

# हॉर्टिकल्चर एक्सपोर्ट प्रशिक्षणासाठी जिल्ह्यातील हॅलो किसानसह २५ कंपन्यांची निवड

पाटोदा । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्यावतीने आयोजित 'हॉर्टिकल्चर एक्सपोर्ट ट्रेनिंग कोर्स' हा पाच दिवसांचा विशेष प्रशिक्षण कार्यक्रम पुणे येथे उत्साहात आणि यशस्वीरित्या पार पडला.या उपक्रमात महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधून निवड करण्यात आलेल्या २५ नामांकित शेतकरी उत्पादक कंपन्यांनी सहभाग नोंदवला होता. त्यामध्ये बीड जिल्ह्यातील हॅलो किसान ॲग्रो सोल्युशन फार्मर प्रोड्युसर कंपनी यांचा देखील समावेश होता,या



प्रशिक्षणाचा उद्देश राज्याच्या कृषी क्षेत्रातून अधिकाधिक दर्जेदार फळे, भाजीपाला व बागायती उत्पादनांची निर्यात वाढविणे हाच होता. प्रशिक्षणादरम्यान विविध क्षेत्रातील नामवंत तज्ज्ञांनी उपस्थित प्रतिनिधींना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेची व्याप्ती, निर्यातीसाठी आवश्यक कागदपत्रे, परवाने, सर्टिफिकेशन प्रक्रिया पान ३ वर

# भंगार वाहनांतूनच विद्यार्थ्यांची वाहतूक

## आरटीओ, पोलिस प्रशासनाचे लागेबांधे, पालकांचा जीव टांगणीला, लक्ष देण्याची मागणी

**आष्टी । प्रतिनिधी**

**कालबाह्य झालेल्या भंगार स्कूल बस व खाजगी क्लुझर, ॲपेरिक्षा, लहान मोठी १५० वर वाहने शाळकरी मुलांना घेऊन दररोज बिनधास्त रस्त्यावर धावतात. आरटीओ कधी याची तपासणी करत नाहीत. पोलिस प्रशासनदेखील याकडे कानाडोळा करत असल्याचे चित्र आष्टी तालुक्यात आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या जीविताला धोका निर्माण होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. संबंधित अधिकाऱ्यांकडून अश्या कालबाह्य वाहनांची चौकशी करून कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.**

**आष्टी तालुक्यात अनेक सेमी इंग्रजी, मराठी व इंग्रजी माध्यमाच्या शाळा आहेत. ग्रामीण भागातून शिक्षणासाठी पालक आपल्या मुलांना आष्टी, कडा, धानोरा, धामणगांवसह ठिकठिकाणी असलेल्या शाळांत शिक्षणासाठी पाठवतात.**

तालुक्यात एकूण १०० च्यावर स्कूल बस, ७० ते ८० खाजगी वाहने मुलांची शाळेत ने-आण करतात. यासाठी पालक वर्गाला मोठी रक्कम मोजावी लागते. परंतु, यापैकी काही ठेकेदार व दलाल मुलांच्या जीवाशी खेळत आहे. अगदी खटारा झालेली वाहने यासाठी वापरण्यात अपघातानंतर काहीच बोध नाही काही दिवसांपूर्वी आष्टी शहरातील एका खासगी शाळेच्या स्कूल बसला नगर-बीड महामार्गावर चालकाचे नियंत्रण सुटल्याने अपघात झाला होता. या अपघातात भरधाव वेगातील बस रस्त्याच्या कडेला असणाऱ्या झाडावर जोरात आदळली. या अपघातात एकमेकांच्या अंगावर कोसळून काही विद्यार्थी जखमी झाले होते.बसमध्ये विद्यार्थ्यांना बसण्यासाठी कोणतीही व्यवस्था नव्हती. मात्र, या अपघातानंतरही आरटोओ, पोलिस प्रशासनाने कोणताही बोध न घेता कारवाई केली नसल्याने कालबाह्य वाहने बिनदिक्कतपणे रस्त्यावर धावत असल्याचे दिसून येत आहे. मोठ्या पान ३ वर

**वाहनामध्ये होतेय विद्यार्थ्यांची कोंबाकोंबी**

ज्या लहान वाहनांची क्षमता १० ते १५ विद्यार्थी घेऊन जाण्याची आहे, त्या वाहनामध्ये २० ते २५ मुले व ज्या बसची ४० प्रवाशांची क्षमता आहे. त्या बसमध्ये मेंढरांसारखी ६० ते ७० मुले कॉवण्यात येत असून हा गोरखधंदा सुरूच आहे. यामुळे मुलांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# दौंडच्या कलाकेंद्रातील गोळीबार प्रकरण : अजितदादांच्या आमदाराच्या भावाला पोलिसांनी घेतले ताब्यात ; गुन्हा दाखल

**दौंड । प्रतिनिधी**

दौंडमधील अंबिका कला केंद्रामधील गोळीबार प्रकरणी ग्रामीण पोलिसांनी तिघांना ताब्यात घेतले आहे. कला केंद्र व्यवस्थापकाच्या तक्रारीवरून यवत पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चार जणांविरोधात यवत पोलिसात गुन्हा दाखल केला आहे. सोमवारी रात्री साडेदहा ते अकराच्या सुमारास गोळीबार झाला होता. गोळीबारात कोणीही जखमी झालेलं नाही अशी माहिती समोर आली आहे. बाळासाहेब मांडेकर, गणपत जगताप, चंद्रकांत मारणे यासह आणखी एका अनोळखी व्यक्तीवर दौंडच्या यवत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या तिघांना ताब्यात घेतले आहे, अशी माहिती ग्रामीण पोलिसांनी दिली आहे. अधिक तपास ग्रामीण पोलिस करत आहे.



पुणे जिल्ह्यातील यवतमध्ये कला केंद्रात गोळीबार करणारा बाळासाहेब मांडेकर हा अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे भोर-वेल्हा मतदारसंघाचे आमदार शंकर मांडेकर यांचा सख्खा भाऊ आहे. शंकर मांडेकर यामुळे अडचणीत येण्याची शक्यता आहे. शंकर मांडेकर हे अजित पवारांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पुणे जिल्ह्यातील भोर वेल्हा मतदारसंघाचे आमदार आहेत. शंकर मांडेकर हे सर्वात आधी राष्ट्रवादी काँग्रेसकडून मुळशी जिल्हा परिषद सदस्य म्हणून निवडून आले. मात्र पाच वर्षानंतर त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला आणि शिवसेनेकडून जिल्हा परिषद सदस्य बनले. शिवसेनेत फुट पडल्यानंतर देखील ते उद्धव ठाकरेंच्या पक्षासोबतच राहिले. मात्र २०२४ च्या विधानसभा निवडणूकीचा अर्ज दाखल करण्याच्या काही दिवस आधी ते अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आले आणि त्यांना विधानसभेची उमेदवारी देण्यात आली आणि पहिल्याच निवडणूकीत ते आमदार बनले.

शंकर मांडेकर हे बांधकाम आणि जमीन खरेदी विक्रीचे व्यवसाय करतात. त्यांच्या सख्ख्या भावाने दौंडमधील कला केंद्रात गोळीबार केल्याने आता ते चर्चेत आले आहेत. वाखारी येथील न्यू अंबिका कला केंद्रामध्ये सोमवारी रात्री साडेदहा ते ११ वाजण्याच्या सुमारास गोळीबार झाला होता. यात सत्ताधारी पक्षातील आमदाराच्या भावाचा समावेश असल्याची चर्चाही होती. पोलिसांकडून हे प्रकरण दडपण्याचे प्रयत्न सुरू होते. याबाबत विरोधकांनी देखील पोलिसांवर आणि सत्ताधाऱ्यांवर टीका केली, टीका होऊ लागल्याने ३६ तासांनंतर स्वतः पोलिसांनी पत्रकार परिषदेत गोळीबाराचा प्रकार घडल्याचे स्पष्ट केले. दरम्यान, अपर पोलिस अधीक्षक गणेश बिरादार यांनी चार संशयितांवर गुन्हा दाखल केल्याचे सांगितले.

न्यू अंबिका कला केंद्राचे व्यवस्थापक बाबासाहेब अंधारे यांनी याबाबत यवत पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीनुसार, गणपत जगताप, बाळासाहेब मांडेकर, चंद्रकांत मारणे आणि एक अनोळखी व्यक्ती यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपींमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार शंकर मांडेकर यांच्या भावाचा समावेश आहे. अपर पोलिस अधीक्षक गणेश बिरादार यांनी दिलेल्या माहितीनुसार, २१ जुलै रोजी वाखारी हद्दीतील न्यू अंबिका कला केंद्रात आरोपींनी आपल्या पिस्तुलातून हवेत गोळीबार केला होता. ही घटना प्रसारमाध्यमातून प्रसिद्ध झाली होती; त्यामुळे पोलिस प्रशासन खडबडून जागे झाले होते. यावेळी पोलिसांनी या घटनेप्रकरणी तपास सुरू केला होता; मात्र पोलिसांना ठोस माहिती मिळाली नव्हती. यावेळी न्यू अंबिका कला केंद्राचे व्यवस्थापक बाबासाहेब अंधारे यांना पोलिसांनी विश्वासात घेतल्यानंतर ही घटना निदर्शनात आली. या गोळीबाराच्या घटनेत मात्र कोणीही जखमी झाले नाही. सर्व आरोपी हे मुळशी तालुक्यातील असल्याची पोलिसांनी प्रथमदर्शनी माहिती दिली.

# कवठे येमाई येथे बी-बियाणांचे दुकान फोडले; एक लाख रुपयांचा मुद्देमाल लंपास

**शिरूर । प्रतिनिधी**

रांजणगाव - लेण्याद्री अष्टविनायक महामार्गालगत असलेले बी.-बियाणांचे दुकान चोरट्यांनी फोडून रोख रक्कम लंपास केल्याची घटना घडली आहे. ही घटना कवठे येमाई (ता. शिरूर) ग्रामपंचायत हद्दीत बुधवारी (ता.२३) पहाटे दोन ते साडेतीनच्या वाजण्याच्या सुमारास घडली आहे. तर शेजारील कपड्याचे दुकान फोडण्याचा चोरट्यांचा प्रयत्न अयशस्वी ठरला आहे.




याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, कवठे येमाई (ता. शिरूर) ग्रामपंचायत हद्दीतील येमाई चौकाजवळ भोर बी. बियाणांचे दुकान आहे. अज्ञात चोरट्यांनी दुकानाचा पत्रा उचकटून दुकानात प्रवेश केला. दुकानातील बी बियाणे, रोख रक्कम सहा हजार रुपये चोरून नेले. तसेच चोरट्यांनी माघारी जाताना सीसीटीव्ही व डीव्हीआरसुद्धा घेऊन गेले आहेत. या घटनेत भोर यांचे रोख रकमेसह सुमारे एक लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. तसेच दुकानाच्या आजू बाजूने लावलेल्या काही कॅमेरांची देखील तोडफोड केली आहे.

भोर बी. बियाणांच्या दुकानाच्या शेजारी असलेले शिवनेरी कलेक्शन कपड्याचे दुकान ही चोरट्यांनी फोडण्याचा प्रयत्न केला. पण तो प्रयत्न त्यांचा अयशस्वी झाला. या परिसरात अनेक अनोळखी व्यक्ती दुचाकीवरून व्यवसाय करण्याच्या निमित्ताने फिरत आहेत. अशा लोकांची सुरक्षिततेच्या दृष्टीने किमान चौकशी करण्याची गरज आहे. दरम्यान, या चोरीच्या घटनेमुळे नागरिकांमध्ये घबराट पसरली आहे. आता गावागावात ग्रामसुरक्षा दल तात्काळ सक्रिय करण्याची गरज निर्माण झाली आहे, अशी नागरिकांकडून भावना व्यक्त होत आहे.

# ‘बँड कला विकास प्रतिष्ठान’च्या वतीने पुनीत बालन यांचा सत्कार; डीजे मुक्त गणेशोत्सवाच्या भूमिकेचे स्वागत

**पुणे । प्रतिनिधी**

गणेशोत्सवात डीजे लावणाऱ्या मंडळांना मदत न करण्याचा निर्णय घेऊन विधायक गणेशोत्सवासाठी पुढाकार घेतल्याबद्दल युवा उद्योजक पुनीत बालन यांचा ‘बँड कला विकास प्रतिष्ठान’ पुणे यांच्याकडून सत्कार करण्यात आला.



‘पुनीत बालन ग्रुप’चे अध्यक्ष पुनीत बालन दरवर्षी गणेशोत्सवात गणेश मंडळांना मोठ्या प्रमाणात आर्थिक सहकार्य करत असतात. याशिवाय ढोल ताशा पथकांनाही त्यांचे मोठे सहकार्य असते. गणेशोत्सवात प्रामुख्याने विसर्जन मिरवणुकीत डीजे लावण्यात असल्याने नागरिकांना त्याचा मोठा त्रास सहन करावा लागतो. तसेच डिजे मुळे अनेकांना शारीरिक इजा झाल्याचेही प्रकार घडले आहेत.

या पार्श्वभूमीवर बालन यांनी यावर्षीचा गणेशोत्सव डीजेमुक्त करण्याचा संकल्प केला असून डीजे लावणाऱ्या गणेश मंडळाना जाहिरात प्रायोजकत्वाच्या माध्यमातून मदत न करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांच्या या भूमिकेचे सर्वच स्तरातून स्वागत होत आहे. बालन यांनी घेतलेल्या या विधायक भूमिकेचे ‘बँड कला विकास प्रतिष्ठान’ यांनीही स्वागत केले असून याबाबत त्यांनी पुनीत बालन यांचा सत्कार केला. यावेळी प्रतिष्ठानचे ओंकार आढाव, औदुंबर शिंदे, हेमंत माने, सुवन गवळी, बाळासाहेब आढाव हे पदाधिकारी उपस्थित होते.

“पुण्याच्या गणेशोत्सवाला एक वैभवशाली परंपरा आहे. या परंपरेला कुठंही गालबोट लागू नये उलट ती पुढील पिढीपर्यंत घेऊन जाण्याची जबाबदारी आज आपल्या सर्वांवरच आहे. त्याचाच भाग म्हणून डीजेचा वापर करणाऱ्या मंडळांना सहकार्य न करण्याचा निर्णय घेतला आणि त्याचं सर्वच स्तरांतून स्वागत झालं, हे अत्यंत महत्त्वाचं आहे. विशेष म्हणजे मंडळांकडूनही सहकार्य मिळत असल्याने हा गणेशोत्सव अधिक उंचीवर घेऊन जाण्यास मोठी मदत होणार आहे.” - पुनीत बालन (अध्यक्ष, पुनीत बालन ग्रुप)

# सामाजिक बांधिलकी जपत महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचा वर्धापनदिन उत्साहात साजरा

**शिरूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचा ६३ वा वर्धापन दिन शिरूर तालुक्यात उत्साहात व सामाजिक जाणीवेने साजरा करण्यात आला. या निमित्ताने शिरूर शिक्षक समितीच्या वतीने गुरुकुल अनाथ आश्रम, कासारी फाटा (संचालक शिवाजी शिंदे) येथील अनाथ मुलांना किराणा, धान्य व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाच्या माध्यमातून ‘शिक्षक समिती’ने आपल्या सामाजिक बांधिलकीचा ठसा पुन्हा एकदा अधोरेखित केला. याप्रसंगी उपस्थित शिक्षक व पदाधिकाऱ्यांनी ‘शिक्षक, विद्यार्थी आणि शिक्षण’ यासंबंधीच्या प्रश्नांवर मार्गदर्शक विचार मांडले.



कार्यक्रमात बोलताना राज्य संघटक शहाजी पवार यांनी सांगितले की,कै. भा.वा. शिंपी गुरुजी यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या शिक्षक समितीचा उद्देश विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला केंद्रस्थानी ठेवून शिक्षक व शिक्षणाशी संबंधित समस्या सोडवण्याचा आहे. ‘न्यायाची चाड आणि अन्यायाची चीड’ हे ब्रीद घेऊन काम करणारी शिक्षक समिती ही एक सक्षम, शिस्तबद्ध, मान्यताप्राप्त आणि विश्वासार्ह संघटना आहे. अन्याय झाला, की संघटना तत्काळ धाव घेते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तालुका अध्यक्ष शरद धोत्रे होते. यावेळी जिल्हा नेते शरद निंबाळकर, संचालक अविनाश चव्हाण, सतीश नागवडे, कैलास पडवळ यांसह अनेक पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहून मनोगत व्यक्त केले. या सामाजिक उपक्रमात सखाराम फराटे, विष्णू चौधर, मारुती निकम, संपत कांदळकर, नामदेव गायकवाड, रमेश देशमुख, लहू चव्हाण, विश्वास साकोरे, खंडू माशेरे, अनिल जगदाळे, विकास गायकवाड, अजित रणसिंग, दादासाहेब कुदळे, रेखाताई लंघे, मालन गायकवाड, राजश्री मोटे, दिपाली पडवळ, नीता वाबळे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमाच्या शेवटी तालुका नेते सुरेश शिवले यांनी उपस्थितांचे आभार मानले. शाळा, विद्यार्थी आणि समाज यांच्यातील बंध अधिक मजबूत व्हावेत या हेतूने शिक्षक समितीच्या वतीने राबवला गेलेला हा उपक्रम कौतुकास्पद ठरला.

# धनकवडीतील वाहन तोडफोड गुन्ह्याची पोलिसांकडून २४ तासात उकल; दोघे जेरबंद

**पुणे । प्रतिनिधी**

धनकवडी परिसरात नागरिकांच्या वाहनांची तोडफोड करून दहशत माजवणाऱ्या टोळीचा छडा सहकारनगर पोलिसांनी अवघ्या २४ तासांत लावला आहे. या प्रकरणी पोलिसांनी दोन तरुण आरोपींसह तीन अल्पवयीन साथीदारांना ताब्यात घेतले आहे. आरोपी आखाड पार्टी करून वाढदिवस असलेल्या अल्पवयीन मुलाला भेटण्यास त्या परिसरात आले होते. मात्र, मित्राने भेटण्यास नकार दिल्याने आरोपींनी रागाने हे कृत्य केल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले.



आम्ही धनकवडीचे भाई आहोत, आमच्या नादाला लागायचं नाही असे आरडा-ओरड करत २३ जुलै रोजी मध्यरात्री सुमारे १२.३० वाजता १५ रिक्षा, दोन कार आणि एका व्हॅनची तोडफोड करण्यात आली होती. तपास करत असताना पोलीस अंमलदार अमोल पवार यांना माहिती मिळाली की, हा गुन्हा सहकारनगर पोलिसांच्या रेकॉर्डवरील गुन्हेगार रोहित कैलास आढाव (२१, रा. किरकटवाडी) याने त्याच्या साथीदारांसह केला आहे. त्यानुसार पोलिसांनी नवले ब्रिज परिसरात सापळा रचून आणि आढाव आणि सुधीर बाप्पू सावंत (१९, रा. गोरावी वस्ती, नांदेड फाटा) यांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली आणि गुन्ह्यात तीन अल्पवयीनांचा समावेश असल्याचेही सांगितले. पोलिसांनी गुन्ह्यातील एक दुचाकी जप्त केली.

ही कामगिरी अपर पोलीस आयुक्त (पश्चिम) राजेश बनसोडे, पोलीस उपायुक्त (परिमंडळ-२) मिलींद मोहिते, सहायक पोलीस आयुक्त (स्वारगेट) राहुल आवारे आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक विठ्ठल पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. तपास पथकात सहायक पोलीस निरीक्षक सागर पाटील, उपनिरीक्षक बापू खुटवड, अंमलदार अमोल पवार, किरण कांबळे, प्रदीप रेणुसे, अमित पदमाळे, महेश भगत आदींचा समावेश आहे.

# पुण्यात सर्किट बेंच होण्यास हरकत नाही - सरन्यायाधीश गवई



**पुणे । प्रतिनिधी**

कोल्हापूरप्रमाणेच पुणे येथे मुंबई उच्च न्यायालयाचे सर्किट बेंच होण्यास हरकत नाही, अशा भावना सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी व्यक्त केल्या आहेत.

येथील वकील आता खंडपीठाचा लढा निर्णायक पातळीवर लढत आहेत. पुणे बार असोसिएशनच्या शिष्टमंडळाने सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश गवई यांची दिल्ली येथे भेट घेतली. त्यावेळी अध्यक्ष ॲड. हेमंत झंजाड, ॲड. सुधीर शहा, ॲड. रवींद्र शिंदे, ॲड. पंकज महाजन, ॲड. अरविंद आव्हाड आदी उपस्थित होते. चर्चेनंतर गवई पुणे येथील खंडपीठासाठी सकारात्मक असल्याचे दिसून आले. कोल्हापूरप्रमाणेच पुणे येथेसुद्धा सर्किट बेंच स्थापनेस कोणतीही हरकत नसल्याचे त्यांनी सांगितले. पुण्याच्या न्याय हक्कासाठीचा हा लढा आम्ही अंतिम विजय मिळवूनच थांबणार, असे मत पुणे बारचे अध्यक्ष ॲड. हेमंत झंजाड यांनी व्यक्त केले.

# अनेक वर्षांपासून अतिक्रमित शीवरस्ता खुला ; विभागीय आयुक्तांकडून सरपंचांचे कौतुक

**पुणे । प्रतिनिधी**

सांगली जिल्ह्यात तासगाव तालुक्यातील आळते आणि खानापूर तालुक्यातील कार्वे या दोन गावामधील अनेक वर्षांपासून अतिक्रमित असल्याने बंद असलेला शीवरस्ता विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या पुढाकाराने व दोन्ही गावच्या सरपंचांच्या सहकार्याने खुला करण्यात आला. विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी या ठिकाणी भेट देऊन समाधान व्यक्त केले.



आळते आणि कार्वे या दोन गावांच्या हद्दीवरील खानापूर तासगाव रस्त्यापासून सुरू होऊन ओढा पर्यंत जाणारा अंदाजे दोन किलोमीटरचा रस्ता बऱ्याच वर्षापासून बंद होता. यामुळे शेतकऱ्यांना ये-जा करण्यास तसेच शेतामध्ये मोठी अवजारे आणि वाहने नेण्यास अडचणी येत होत्या. या कारणाने त्यांच्या उत्पन्नावरही परिणाम होत होता. या रस्त्याची शासकीय तसेच खाजगी मोजणी होऊन सुद्धा शेतकऱ्यांमध्ये त्या रस्त्याबाबत एकमत होत नव्हते. दोन्ही तालुक्यांच्या हद्दीवरील रस्ता हा या खानापूर व तासगाव या दोन तालुक्यांच्या शीवेवरचा हा रस्ता खुला झाल्याने दोन्ही तालुक्यातील शेतकऱ्यांना फायदा होणार आहे.

विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार यांनी आळते गावचे सरपंच बालाजी मोहिते आणि कार्वे गावचे सरपंच बाळासो जाधव यांची भेट घेऊन याकामी पुढाकार घेतल्याबद्दल दोघांचे तसेच शेतकऱ्यांचे कौतुक केले. यासोबतच त्यांनी इतर शेतकऱ्यांनीही सामंजस्याची भूमिका घेऊन महसूल प्रशासनाच्या मदतीने अधिकाधिक रस्ते खुले करून घ्यावेत तसेच त्या रस्त्यांची सात बारावर नोंद करून घ्यावी, असे आवाहन केले. यावेळी विटा उपविभागाचे उपविभागीय अधिकारी डॉ. विक्रम बांदल आणि खानापूर - विटा तालुक्याचे तहसीलदार योगेश्वर टोंपे, कार्वे गावच्या शेतकरी तसेच पोलीस पाटील ज्योत्स्ना पाटील, अमित पाटील, रोशन जाधव व आळते गावचे माणिक सूर्यवंशी उपस्थित होते.

# नरेंद्राचार्यजी महाराज यांचा पुण्यात समस्या मार्गदर्शन व दर्शन सोहळा उत्साहात

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील खांदवे नगर, नगर रोड, खराडी बायपास जवळील महालक्ष्मी लॉन्स येथे जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराज यांचा दोन दिवसीय समस्या मार्गदर्शन व दर्शन सोहळा मंगळवार आणि बुधवार, दिनांक २२ व २३ जुलै २०२५ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या भव्य-दिव्य कार्यक्रमाला जिल्ह्यातून सुमारे २५ हजार भक्तगणांनी हजेरी लावली.




ढोल-ताशांचा गजर, पुष्पवृष्टी आणि भक्तिमय भजनांनी नरेंद्राचार्यजी महाराज यांचे स्वागत करण्यात आले. संतपीठावर आगमनानंतर पाद्यपूजन झाले, त्यानंतर महाराजांचे मार्मिक प्रवचन झाले. प्रवचनानंतर समस्या मार्गदर्शन आणि दर्शनाचा कार्यक्रम झाला.

मंगळवारी ९४८ भक्तांनी उपासक दीक्षा, तर बुधवारी ७२१ भक्तांनी साधक दीक्षा ग्रहण केली. कार्यक्रमस्थळी आयोजित आरोग्य शिबिरात १,७५३ भाविकांनी सहभाग घेतला. जगद्गुरुश्रींचा गजर करत कार्यक्रमाची सांगता झाली. दोन्ही दिवस भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल मुख्य पीठ नाणिजधाम क्षेत्र पश्चिम महाराष्ट्र पीठ समितीने आयोजक आणि मान्यवरांचे आभार मानले. विनायक नाईक, पीठ व्यवस्थापक, क्षेत्र पश्चिम महाराष्ट्र स्व- स्वरूप संप्रदाय यांनी ही माहिती दिली.

# शिरूरच्या युवा उद्योजकाचा अनोखा वाढदिवस : विद्यार्थ्यांना पंधरा हजार वह्यांचे मोफत वाटप, गुणवंतांचा सत्कार

**शिरूर । प्रतिनिधी**

सामाजिक भान, शिक्षणप्रेम व कर्तव्यभावना, खिलाडूवृत्ती जपत युवा उद्योजक सागरआप्पा दंडवते यांनी आपला वाढदिवस अनोख्या पद्धतीने साजरा करत एक आदर्श निर्माण केला आहे. वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात गावातील इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंत शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना पंधरा हजार वह्यांचे मोफत वाटप करण्यात आले. तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंतांचा सत्कार करण्यात आला. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले प्रा. वसंत हंकारे यांनी युवकांना मार्गदर्शन करताना म्हटले, आई-वडिलांच्या त्यागाची जाणीव ठेवत तरुणांनी व्यसनांपासून दूर राहावे. मुलींनी खोट्या प्रेमाच्या भूलथापांना बळी पडू नये. आपल्या वर्तनाने आई-वडिलांना दुःख न देता त्यांचा अभिमान वाटेल असे आचरण करावे.



कार्यक्रमात धाराशिव येथील युवा कबड्डीपटू स्वाभिमान शिंदे, विक्रीकर अधिकारी अभिजित गायकवाड, सनदी लेखापाल शुभम शिंदे, पुणे ग्रामीण पोलीस दलातील अनिल शिंदे, राज्य राखीव पोलीस दलातील प्रशांत कोठावळे, वैद्यकीय क्षेत्रातील शुभम गोडसे, प्रतीक्षा भोसले, माधुरी गडदरे, उदयोन्मुख बॅडमिंटनपटू खुशी इनामदार, तलवारबाजीत यशस्वी ठरलेली सावी ताठे यांचा विशेष सत्कार सन्मानचिन्ह देऊन करण्यात आला.

पूर्व माध्यमिक व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा आणि त्यांचे मार्गदर्शक शिक्षकांचाही विशेष सन्मान करण्यात आला. याशिवाय, आर्थिक परिस्थिती प्रतिकूल असतानाही जिद्दीने कबड्डीचा सराव करणाऱ्या स्वाभिमान धनंजय शिंदे या धाराशिव येथील कबड्डीपटूचा रु. ५१,१११/- च्या प्रोत्साहनपर बक्षिसाने गौरव करण्यात आला. यावेळी सागर दंडवते यांनी जाहीर केले की, भविष्यात कोणत्याही खेळाडूला दुखापत झाल्यास त्यावर होणाऱ्या खर्चाची पूर्ण जबाबदारी मी घेईन. असे आश्वासन त्यांनी दिले.

सामाजिक जाणीव ठेवत शिरूर येथील अनाथालयातील सर्व विद्यार्थ्यांना अन्नदान करून त्यांनी आपला वाढदिवस खर्या अर्थाने विधायक मार्गाने साजरा केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य अनिल शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन अविनाश गायकवाड व राजेंद्र लष्करे, तर आभार प्रदर्शन प्रा. सुदाम गायकवाड यांनी केले. हा उपक्रम युवकांसाठी प्रेरणादायी ठरला असून, समाजकार्य आणि शिक्षणविकासाचा एक आदर्श नमुना म्हणून सागरआप्पा दंडवते यांच्या वाढदिवसाचा दिवस संस्मरणीय ठरला.